नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष १६ * अंक ३११ * * भंडारा * | गुरुवार, दिनांक ८ मे २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## १८ भारतीय एअरपोर्टचे ऑपरेशन बंद

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ७ :

पाकिस्तानवरील हवाई हल्ल्यानंतर भारताने ७ राज्यांमधील १८ विमानतळांवरील विमान वाहतूक बंद केली आहे. प्रमुख विमानतळांमध्ये श्रीनगर, जम्मू, लेह, चंदीगड, बिकानेर, जोधपूर, राजकोट, धर्मशाळा, अमृतसर, भुज आणि जामनगर यांचा समावेश आहे. ही विमानतळे पाकिस्तान सीमेजवळ आहेत.

एअर इंडिया, इंडिगो, स्पाइसजेट, एअर इंडिया एक्सप्रेस, अकासा एअर आणि काही परदेशी विमान कंपन्यांनी सुमारे २०० उड्डाणे रद्द केली आहेत. जम्मू आणि काश्मीर, पंजाब आणि राजस्थानमधील अनेक जिल्ह्यांमध्ये शाळा बंद करण्यात आल्या आहेत.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## पापी पाकिस्तानची पिंग-पिंग

कविवर्य सुरेश भट यांनी म्हटल्याप्रमाणे, पहाटे पहाटे मला जाग आली. तिथे पाकड्यांची भुई लाल झाली. आज पहाटे अचानक अशीच अवस्था पाकिस्तानची झाली. कारण पाकिस्तानातील आतंकवाद्यांच्या अड्ड्यांवर भारतीय फौजेच्या जबरदस्त हल्ल्यानंतर जे फटाके वाजत आहेत. त्यावरून पाकिस्तानला भारताची सेना भारतात बसून काय काय करू शकते, याची प्रचिती आली असावी. अटल बिहारी वाजपेयी यांचे सरकार असताना ज्याला विमानाचे अपहरण करून भारताच्या कैदेतून सोडवण्यात आले. त्या महाहरामी मसुद अझरला शेवटी भारताच्या दणक्याने आज रडायलाच आले. त्याच्या पापी परिवारातील दहा लोकांचा खात्मा भारताच्या वीर सेनेने केला. या मसुद्याला भारतातील निरपराधी लोकांना मारताना हसू येत होते. त्याच्या गुप्त अड्ड्यावर तयार केलेले आतंकवादी आणि हा मसुद्या भारतीयांचे बळी गेले तेव्हा जोर जोराने हसले होते. पण भारताच्या भीम पराक्रमी सैन्याने ते किती खोल गड्ड्यात फसलेले आहेत. ते आता त्यांना दाखवून दिले आहे आणि त्यामुळे ते बऱ्याच गोष्टी समजून चुकलेले आहेत. तो मसुद्या आता स्वतःसाठी मरण मागत आहे. अरे लेका मसूद्या, जेव्हा तू भारताच्या संसदेवर आक्रमण केलेस. त्या आधी अनेकांना ठार मारलेस. अनेक निरपराध तुझ्यामुळे या जगात उरले नाहीत. तेव्हा तुला जराही लाज वाटली नाही का रे. तू तयार केलेल्या तुझ्या त्या नादान बगलबच्चांनी अनेक भारतीय महिलांचे सिंदूर उध्वस्त केले. कुंकू पुसून टाकले. तेव्हा तुला आपली मर्दानगी दाखवण्याची संधी मिळाली होती. पण आता कालच्या २५ मिनिटांच्या कारवाईने तुझ्या परिवाराला जहन्नूम दाखवणाऱ्या भारतीय लष्कराला तू ओळखलेच नव्हतेस. आंतरराष्ट्रीय सीमेपासून शंभर किलोमीटर आत घुसून ज्या ठिकाणी आपण कारवाई केली. तिथे या आतंकवाद्यांचा अड्डा होता. तो जैशचा सर्वात मोठा कॅम्प होता. त्याच्या अलीकडे ठिकठिकाणी आतंकवाद्यांचे अड्डे होते. या अड्ड्यांवर अगदी नेमका मारा करून भारतीय क्षेपणास्त्रांनी आतंकवाद्यांच्या सगळ्या बिभत्स हल्ल्यांचा बदला घेतला आहे. भारताने पाकिस्तान मधील सर्वच आतंकवाद्यांचा बारकाईने अभ्यास केला. त्यानंतर पद्धतशीरपणे केवळ तेच अड्डे नष्ट करण्याचे कामगिरी केली. यालाच पिन पोईंटेड अटॅक म्हणतात. याशिवाय भारताने पाकिस्तानच्या सैनिकी अड्ड्यांवर एकही कारवाई केली नाही. पाकिस्तानचे वल्गनावीर बिलावल भुत्तोपासून ते अगदी बेगम मरियम पर्यंत न्यूक्लिअर हल्ल्याच्या गप्पा मारणारे आता ढसाढसा रडत आहेत. पाकिस्तानचा सेना अध्यक्ष मुनीर याचे थोबाड त्याचा बाप मेल्यासारखे झाले आहे. पाकिस्तानचे प्रधानमंत्री तसेही पाकिस्तान सेना अध्यक्ष मुनीर याच्याच हातचे बाहुले आहेत. त्यामुळे त्या दोघांचेही चेहरे इतके रडके होते की, ते पाहिल्यावर त्यांची दया येणे तेवढेच बाकी होते. भारताच्या राफेल आणि मिराज या विमानांनी स्काल्प आणि हॅमर पद्धतीचा उपयोग करून पाकिस्तानातील हे सर्व आतंकवाद्यांचे अड्डे उध्वस्त केले. १९४८ पासून आज पर्यंत प्रत्येक वेळी पाकिस्तानला पळता भुई थोडी करणाऱ्या भारताच्या नेतृत्वाला आणि सेनेला पाकड्यांनी ओळखलेच नव्हते. पाकिस्तानी आतंकवाद्यांच्या अड्ड्यांना गड्ढ्यात बदलवून आपण म्हणजेच भारताने जी बहादुरी दाखवली. त्यात भारताचे कवडीचेही नुकसान झालेले नाही. ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. याचाच अर्थ पाकिस्तानच्या वल्गना कितीही मोठमोठ्या असल्या. तरी आपल्या देशाच्या सुरक्षे बाबतची त्यांची तयारी शून्य होती आणि आहे. त्यांना एखाद्या भुरट्या चोराप्रमाणे फक्त पोकळ धमक्यांच्या वल्गना करणे आणि लपून वार करणे, एवढेच ठाऊक होते. हे यानिमित्ताने सर्व जगाला कळले ते बरेच झाले. बांगला देशच्या लढाईत ज्याप्रकारे हजारो पाकिस्तानी सैनिकांनी मान खालून खाली घालून शरणागती पत्करली होती. तीच परिस्थिती आताही उद्भवलेली आहे. पाकिस्तान वरील कारवाईनंतर शहाबाज शरीफ यांनी रडता रडता सांगितले की, भारताच्या ऐंशी जहाजांनी आमच्यावर हल्ला केला. आम्हाला बदला घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. म्हणजे हे लोक पडले तरी, त्यांची टांग वरच आहे. ही टांग तोडणे भारतासाठी कठीण नाही. तुमची हिम्मत केवळ तुमच्या लंब्याचवड्या वल्गना करण्यातच आहे. बाकी पाकिस्तानात आता सेना आणि सरकार यांच्या बदलाचे वातावरण आहे. त्यात सत्तापालट आणि पाकिस्तानी सेनेच्या पदांमध्ये पालटही होऊ शकतो. आम्ही भारताच्या खंबीर सरकारचे, रणवीर सेनेचे आणि शूरवीर जनतेचे शतशः अभिनंदन करतो आणि आता मनापासून म्हणतो. पाकिस्तान मुर्दाबाद, हिंदुस्तान जिंदाबाद!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# घरात घुसून ठोकले!

पहलगाम हल्ल्याचा बदला | भारतीय हवाई दलाचे पाकव्याप्त काश्मीरमध्ये हवाई हल्ले | पाकच्या दहशतवादी संघटनांना प्रत्युत्तर

## ९ दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त ■ १०० हून अधिक दहशतवादी ठार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर/मुंबई, दि. ७ :

अखेर भारताने पाकिस्तानच्या दहशतवादी संघटनांना प्रत्युत्तर दिले. भारतीय हवाई दलाने मंगळवारी रात्री १:०५ वाजता पाकिस्तान आणि पीओकेमध्ये म्हणजेच पाकव्याप्त काश्मीरमध्ये हवाई हल्ले केले.

या हल्ल्यात ९ दहशतवादी अड्ड्यांवर हल्ला करण्यात आला आहे. यामध्ये १०० हून अधिक दहशतवादी मारले गेले आहेत. भारताची ही प्रत्युत्तरात्मक कारवाई पहलगाम हल्ल्याच्या १५ दिवसांनंतर करण्यात आली आहे आणि त्याला 'ऑपरेशन सिंदूर' असे नाव देण्यात आले आहे. हे नाव त्या महिलांना समर्पित आहे ज्यांचे पती २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी मारले होते.

कॅबिनेट बैठकीत पंतप्रधान मोदींनी ऑपरेशन सिंदूरसाठी तिन्ही सैन्यांचे कौतुक केले. ऑपरेशन सिंदूरबद्दल त्यांनी सांगितले की हा नवा भारत आहे. संपूर्ण देश आपल्याकडे पाहत होता. हे घडणे अपरिहार्य होते.

पाकिस्तानच्या इंटर-सर्व्हिसेस पब्लिक रिलेशन्सचे संचालक लेफ्टनंट जनरल अहमद शरीफ चौधरी म्हणाले की, भारताने २४ क्षेपणास्त्रे डागली आहेत. वृत्तसंस्था एएनआयने सूत्रांच्या हवाल्याने सांगितले की, पंतप्रधान मोदी रात्रभर ऑपरेशन सिंदूरवर लक्ष ठेवून होते.

लष्कराने पत्रकार परिषद घेतली. यामध्ये परराष्ट्र मंत्री विक्रम मिस्त्री, लष्कराच्या कर्नल सोफिया कुरेशी आणि हवाई दलाच्या विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी ऑपरेशनची माहिती दिली. सर्वप्रथम, हवाई हल्ल्याचा २ मिनिटांचा व्हिडिओ दाखवण्यात आला. यामध्ये भारतीय सैन्याने दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर केलेली कारवाई दाखवण्यात आली.


विदेश सचिव विक्रम मिस्त्री


विंग कमांडर व्योमिका सिंग


कर्नल सोफिया कुरेशी


दहशतवाद्यांच्या उद्ध्वस्त स्थळाची पाहणी करताना पाकी सैनिक




कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी सांगितले की, ही कारवाई पहाटे १:०५ ते १:३० च्या दरम्यान झाली. पाकिस्तान आणि पीओकेमध्ये ९ लक्ष्ये ओळखली गेली. आम्ही त्यांचा नाश केला. लॉंचपॅड आणि प्रशिक्षण केंद्रांना लक्ष्य करण्यात आले.

पीओकेमधील मुझफ्फराबाद येथील लष्करच्या सवाई नाला प्रशिक्षण केंद्राला प्रथम लक्ष्य करण्यात आले. त्यानंतर इतर ठिकाणांवर हल्ले केले गेले. पाकिस्तानच्या इंटर-सर्व्हिसेस पब्लिक रिलेशन्स चे संचालक लेफ्टनंट जनरल अहमद शरीफ चौधरी यांनी सांगितले की, भारताने २४ क्षेपणास्त्रे डागली. वृत्तसंस्था एएनआयने सूत्रांच्या हवाल्याने सांगितले की, पंतप्रधान मोदी रात्रभर ऑपरेशन सिंदूरवर लक्ष ठेवून होते.

दरम्यान, भारतीय लष्कराने सांगितले की, या हल्ल्यात फक्त दहशतवाद्यांच्या अड्डयांवरच हल्ला करण्यात आला. कोणत्याही पाकिस्तानी लष्करी ठिकाणावर हल्ला झाला नाही. वृत्तसंस्था एएनआयने सूत्रांच्या हवाल्याने सांगितले की, जैश-ए-मोहम्मद आणि लष्करच्या लपण्याच्या जागा लक्ष्य म्हणून निवडण्यात आल्या होत्या. या कारवाईने भारतात जल्लोष आहे.

### अभी पिक्चर बाकी है



जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याला भारतीय लष्कराने जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. यानंतर भारतीय नागरिकांनी एकच जल्लोष सुरू केला आहे. त्यात निवृत्त लष्कर प्रमुख मनोज नरावणे यांनी अभी पिक्चर बाकी हैं, असे म्हटले आहे.

जर पाकिस्तानने भारतातील लष्करी प्रतिष्ठानांना लक्ष्य करून संघर्ष वाढवण्याचा निर्णय घेतला तर असे आणखी हल्ले शक्य आहेत, असे माजी लष्करप्रमुख मनोज नरवणे यांनी संकेत दिले आहेत.

## चकमकीत २२ नक्षल्यांना कंठस्नान

■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि. ७ :

महाराष्ट्र, तेलंगणा आणि छत्तीसगड सीमेवरील घनदाट जंगलात करेगुट्टा टेकडीवर गेल्या १५ दिवसांपासून सुरू असलेल्या मोठ्या नक्षलविरोधी अभियानात २२ नक्षलवादी ठार झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.

काही दिवसांपूर्वी याच परिसरात ३ महिला नक्षलवाद्यांचे मृतदेह आढळून आले होते. अभियान अजूनही सुरू असल्याने मृतांचा आकडा वाढू शकतो.

कुख्यात नक्षल कमांडर माडवी हिडमा नेतृत्व करीत असलेल्या सर्वात आक्रमक बटालियन क्रमांक १ चे जवळपास ७०० हून अधिक नक्षलवादी छत्तीसगड-तेलंगणा सिमवेरील करेगुट्टा टेकडीवर एकत्र आल्याची माहिती सुरक्षा यंत्रणेला मिळाली होती. यावरून केंद्र आणि राज्य सुरक्षा दलातील तब्बल १० हजारहून अधिक जवानांनी या परिसरात नक्षलविरोधी मोहीम उघडली. याला ऑपरेशन संकल्प असे नाव देण्यात आले आहे.



गेल्या पंधरा दिवसांपासून जवानांनी या टेकडीला घेरले आहे. दरम्यान, ७ मे रोजी झालेल्या चकमकीत २२ नक्षलवादी ठार झाल्याची माहिती समोर आली आहे. या मोहिमेदरम्यान ५० हून अधिक जवानांना उष्माघाताचा सामना करावा लागला आहे. मोहिमेवरील जवानांना हेलिकॉप्टरच्या माध्यमातून साहित्य पुरवण्यात येत आहे.

नक्षलवाद्यांनी पत्रक काढून ही मोहीम थांबवण्याची विनंती केली होती. मात्र, या टेकडीवर पूर्ण नियंत्रण मिळवल्याशिवाय मोहीम थांबविण्यात येणार नाही, असे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे येत्या काही दिवसात आणखी मोठी चकमक होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. उशिरापर्यंत मृत नक्षलवाद्यांची ओळख पटलेली नव्हती. या ठिकाणी नक्षलवाद्यांचे काही मोठे नेते असल्याचा संशय आहे.

टेकडीवरील गुहेवर ताबा, ड्रोनचा वापर मोहिमेदरम्यान जवानांनी टेकडीवर असलेल्या एका गुहेवर ताबा मिळविला होता.

## भारत २०४० पर्यंत चंद्रावर : मोदी

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ७ :



२०४० पर्यंत भारतीय अंतराळवीर चंद्रावर पोहोचेल. येत्या आठवड्यात एक भारतीय आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणार आहे. ही भारतासाठी अभिमानाची गोष्ट आहे. चंद्राव्यतिरिक्त, मंगळ आणि शुक्र देखील आपल्या रडारवर आहेत, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

पंतप्रधान बुधवारी अंतराळ संशोधनावरील जागतिक परिषदेत सहभागी झाले. पंतप्रधान म्हणाले की, चांद्रयान-१ ने चंद्रावर पाण्याचा शोध लावण्यास मदत केली. चांद्रयान-२ मोहीम यशस्वी झाली. चांद्रयान-२ ने उच्च रिझोल्यूशनचे फोटो पाठवले होते. भारतीय अंतराळवीर लवकरच अंतराळात जाणार आहेत. अंतराळ क्षेत्रातील भारताचा प्रवास अद्भुत राहिला आहे, असेही ते म्हणाले.

## कुंकू पुसणाऱ्यांचा खात्मा

■ महासागर प्रतिनिधी,मुंबई, दि. ७ :



पहलगाममध्ये ज्या क्रूरपणे आपल्या मायभगिनींना मारण्यात आलं, त्या घटनेचा संताप भारतीयांच्या मनात खोलवर होता. आजच्या ऑपरेशनमुळे संपूर्ण देशाला समाधान मिळालं आहे. आमच्या बहिणींचं कुंकू पुसणाऱ्या दहशतवाद्यांना समाप्त करण्याचं काम भारताने केलं आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. आज आपल्या सेनेने अतिशय अचूकतेने व ताकदीनं ही कारवाई पार पाडली पाडल्याचे ते म्हणाले.

## ट्रकची कारला धडक, ५ विद्यार्थी ठार

■ वृत्तसंस्था, पटियाला, दि. ७ :

पंजाबमधील पटियाला जिल्ह्यात बुधवारी झालेल्या रस्ते अपघातात पाच विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. समाना रोडवरील नासुपूर गावाजवळ वाळूने भरलेल्या ट्रकने शालेय विद्यार्थ्यांना घेऊन जाणाऱ्या एका खाजगी वाहनाला धडक दिल्याने हा अपघात झाला. ही धडक इतकी भीषण होती की खाजगी कार झाडावर आदळली.

सर्व विद्यार्थी पटियालाहून समाना येथील त्यांच्या घरी परतत होते. अपघातानंतर घटनास्थळी आरडाओरडा सुरू झाला. जोरदार धडकेमुळे वाहनाचा पुढचा भाग पूर्णपणे चिरडला गेला, त्यामुळे विद्यार्थ्यांचे मृतदेह बाहेर काढण्यासाठी क्रेनचा वापर करावा लागला. या अपघातात पाच विद्यार्थ्यांचा जागीच मृत्यू झाला, तर आणखी एका विद्यार्थ्याला गंभीर अवस्थेत सरकारी राजींद्र रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून ट्रक ताब्यात घेतला आणि घटनेनंतर पळून गेलेल्या चालकाचा शोध सुरू केला. प्राथमिक तपासात निष्काळजीपणे गाडी चालवल्याची शक्यता वर्तवली जात आहे. अपघाताची बातमी मिळताच पीडित कुटुंबांमध्ये एकच खळबळ उडाली आणि सामना परिसरात शोककळा पसरली.



### पिकअप खड्डयात कोसळले ५ ठार, १५ जखमी

■ राजसमंद :

राजसमंदमध्ये एक पिकअप अनियंत्रित होऊन २० फूट खोल दरीत कोसळला. या अपघातात चार मुलांसह पाच जणांचा मृत्यू झाला तर १५ जण जखमी झाले.

रात्री भीम पोलिस स्टेशन परिसरात हा अपघात झाला. पालीतील मारवाड येथील बोरीमाडा सरन गावातील एक कुटुंब हुंडा घेऊन राजसमंदच्या भीम भागातील दारा गावात जात होते. कुटुंबातील सुमारे ३५ सदस्य दोन पिकअप वाहनांमधून प्रवास करत होते. पिकअपचा टायर फुटला. तिचे नियंत्रण सुटले आणि ती खड्डयात पडली.

## उमरेड दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना ३५ लाखांची आर्थिक मदत

### मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदतीची कार्यवाही पूर्ण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

नागपूर जिल्ह्यातील उमरेड एमआयडीसी येथील एमएमपी इंडस्ट्रीज लिमिटेड या ?ल्युमिनियम फॉईल फॅक्टरीत ११ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळच्या सुमारास झालेल्या भीषण स्फोटात सात कामगारांचा मृत्यू झाला.

या दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाच्या माध्यमातून प्रत्येकी ५ लाख रुपये या प्रमाणे एकूण ३५ लाख रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे, अशी माहिती निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी दिली.

या स्फोटात मृत्यूमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांना तातडीने मदत मिळावी यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेतला होता. दुर्घटनेनंतर त्यांनी स्वतः रुग्णालयात जाऊन जखमी रुग्णांची भेट घेतली आणि त्यांच्या नातेवाइकांशी संवाद साधला. मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिलेल्या आश्वासनानुसार राज्य सरकार मृतांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत असून, सरकारचा हा निर्णय या दुःखद घटनेतील कुटुंबांना दिलासा देणारा ठरतो.

रामेश्वर नाईक यांनी सांगितले की, ही आर्थिक मदत केवळ आधाररूपी नव्हे, तर अशा कठीण प्रसंगी सरकार जनतेसोबत आहे, याचा एक ठोस पुरावा आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून गरजू कुटुंबांना मदत पोहोचवण्याचा शासनाचा प्रयत्न सातत्याने सुरू आहे.

या घटनेने संपूर्ण राज्याला हादरवून टाकले असले तरी सरकारकडून तत्परतेने घेतलेली ही मदतकार्यवाही सामाजिक बांधिलकीचे उदाहरण ठरली आहे.

दरम्यान, या घटनेतील मृतकांच्या कुटुंबियांना कंपनीच्यावतिने आधीच प्रत्येकी ६० लाख रूपयांचे अर्थसहाय्य जाहीर करण्यात आले आहे.






# गुलाबराव देवकरांच्या अडचणीत वाढ
## १० कोटींचे कर्ज व भ्रष्टाचाराचे आरोप



**जळगाव** : जळगाव जिल्ह्यातील माजी मंत्री गुलाबराव देवकर यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. अजित पवारांच्या पक्षात प्रवेश केल्यानंतर गुलाबराव देवकर यांच्या अडचणी कमी होणे अपेक्षित होते. परंतु तसे झाले नसल्याचे दिसत आहे. तसेच त्यांच्या अडचणीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. तीन दिवसांपूर्वीच म्हणजे 3 मे रोजी जळगाव जिल्ह्यातील शरद पवार गटाचे माजी मंत्री गुलाबराव देवकर यांच्यासह अनेक नेत्यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. प्रवेश करून तीन दिवसही पूर्ण होत नाहीत तोवर देवकर यांच्या मागे चौकशीचा ससेमिरा लागला आहे. गुलाबराव देवकर यांच्या 10 कोटी रुपयांच्या कर्जाप्रकरणी ही चौकशी करण्यात येत आहे. धुळे येथील उपजिल्हा निबंधक राजेंद्र वीरकर यांच्या नेतृत्वात चौकशी पथक जिल्हा बँकेत पोहोचले होते. श्रीकृष्ण शिक्षण संस्थेच्या वतीने जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून घेण्यात आलेल्या 10 कोटी रुपयांच्या कर्जाबाबत चौकशी करण्यात येत आहे. गुलाबराव देवकर हे या संस्थेचे अध्यक्ष आहेत. त्यामुळे त्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. गुलाबराव देवकर यांनी हे कर्ज विधानसभा निवडणुकीच्या काळात बेकायदेशीरपणे घेतले असल्याचा आरोप शिवसेना शिंदे गटाचे मंत्री व देवकर यांचे कट्टर विरोधक गुलाबराव पाटील यांनी केला होता. देवकर यांनी अनेक आर्थिक गैरव्यवहार व भ्रष्टाचार केले आहेत. त्यावर पांघरून घालण्यासाठी गुलाबराव देवकर यांनी अजित पवारांच्या गटात प्रवेश केला असल्याचा आरोप गुलाबराव पाटील यांनी केला आहे. याच पार्श्वभूमीवर गुलाबराव देवकर यांची चौकशी सुरू झाली आहे.

# शिवसेना पक्षचिन्ह आणि नावाचा वाद
## ठाकरे गटाची सुप्रीम कोर्टाकडे तातडीने सुनावणीची मागणी, कपिल सिब्बलांनी मांडली याचिका

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**




उद्धव ठाकरे गटाने शिवसेना पक्षचिन्ह आणि पक्षाच्या नावाच्या वादावरील आपल्या याचिकेवर लवकरात लवकर सुनावणी करण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयाकडे केली आहे. सुप्रीम कोर्टाने मंगळवारी राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका 4 महिन्यांत घेण्याचे निर्देश दिले आहेत. अशात ठाकरे गटाच्या याचिकेवर तत्काळ सुनावणी करावी, अशी मागणी उद्धव ठाकरे यांच्या वतीने ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाकडे केली आहे.

या मागणीवर न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी सिब्बल यांना तुम्हाला युक्तिवाद मांडण्यासाठी किती वेळ लागेल? असे विचारले असता, त्यावर सिब्बल यांनी 20 मिनिटांचा वेळ मागितला. सिब्बल यांनी सांगितले की, ग्रामीण भागात मतदारांना पक्षचिन्ह ओळखण्यात अडचण येऊ शकते. शहरी भागात लोक साक्षर असले तरी ग्रामीण भागातील मतदारांमध्ये पक्षचिन्हाची स्पष्टता आवश्यक आहे. यावर न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी नमूद केले की, शहरी मतदारांना अडचण येणार नाही, मात्र ग्रामीण भागात हे खरेच एक समस्या ठरू शकते. या याचिकेची सुनावणी उन्हाळी सुट्ट्यांच्या काळात लावण्यात यावी, अशीही मागणी कपिल सिब्बल यांनी सुर्वोच्च न्यायालयाकडे केली आहे.

उद्धव ठाकरे गटाने ही याचिका निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देत दाखल केली आहे. या प्रकरणात सिब्बल यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या 2023 च्या संविधान खंडपीठाच्या निर्णयाचा उल्लेख केला.

या निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे की, विधिमंडळातील संख्याबळ हे कोणता गट खरा पक्ष आहे हे ठरविण्याचा निकष होऊ शकत नाही. मात्र, निवडणूक आयोगाने केवळ विधायी बहुमतावर आधारित निर्णय घेतल्याचे सिब्बल यांनी स्पष्ट केले, असे कपिल सिब्बल यांनी कोर्टात म्हटले आहे.

2022 मध्ये शिवसेनेत मोठी फूट पडली होती. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील 40 आमदारांच्या बंडखोरीनंतर पक्ष दोन गटात विभागला गेला. त्यानंतर निवडणूक आयोगाने 'शिवसेना' हे नाव आणि 'धनुष्यबाण' हे पक्षचिन्ह एकनाथ शिंदे गटाला दिले.

उद्धव ठाकरे गटाने दाखल केलेल्या याचिकेत म्हटले आहे की, निवडणूक आयोगाने हे लक्षात घेतले नाही की उद्धव ठाकरे गटाला पक्षाच्या मूळ कार्यकर्त्यांचा आणि कार्यकर्त्यांच्या मोठ्या वर्गाचा पाठिंबा आहे. आयोगाने केवळ विधायकी समर्थनाचा विचार करून पक्ष ओळख ठरवली.

याशिवाय, निवडणूक आयोगाने परिच्छेद 15 अंतर्गत विवादांचे तटस्थ मध्यस्थ म्हणून आपले कर्तव्य बजावण्यात अपयशी ठरले आहे आणि त्यांनी आपली संवैधानिक स्थिती कमकुवत करण्याचे काम केले आहे, असेही याचिकेत म्हटले आहे.

# मिठी नदी गाळ कंत्राट
## गैरव्यवहार प्रकरणी दोघांना अटक

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**

मिठी नदीचा गाळ काढण्याच्या प्रकल्पातील कथित अनियमितता आणि निधीच्या कथित गैरवापराबाबत विशेष तपास पथकाने (एसआयटी) दोन मध्यस्थांना अटक केली असून याप्रकरणी तीन पालिका अधिकारी, पाच कंत्राटदार, तीन मध्यस्थ व दोन कंपन्यांविरोधात आझाद मैदान पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गैरव्यवहारामुळे पालिकेचे ६५ कोटी ५४ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा आरोप असून आरोपींशी संबंधीत ठिकाणांवर छापे मारण्यात आला होता.

केतन कदम व जय जोशी अशी अटक आरोपींची नावे आहेत. आरोपींच्या माध्यमातून कंत्राट देण्यात आले होते. त्याबाबत बैठकांचेही आयोजन करण्यात आल्याचा आरोप आहे. याबाबत एसआयटी अधिक तपास करत असून मिठी नदीतील गाळ काढण्यासाठी मागील वीस वर्षांपासून हा प्रकल्प सुरू होता. एकूण१८ कंत्राटदारांना ११०० कोटी रुपयांचे कंत्राट देण्यात आल्याचे प्राथमिक निष्पन्न झाले. त्यानंतर आर्थिक गुन्हे शाखेने याप्रकरणी महापालिकेचे सहाय्यक अभियंते प्रशांत रामुगडे, उपमुख्य अभियंते गणेश बेंद्रे आणि तायशेट्टे, निखिल कन्स्ट्रक्शन आणि जेआरएस इन्फ्रास्ट्रक्चर या कंपन्यांचे संचालक दीपक मोहन, किशोर मेनन, जय जोशी, केतन कदम आणि भूपेंद्र पुरोहित यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

# एकाच फोटोमध्ये विविध घोटाळ्यांतील रथी महारथी
## अंजली दमानियांचा महायुतीवर निशाणा



**मुंबई** : सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी एक ट्विट करत महायुती सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे. अंजली दमानिया यांनी एक फोटो शेअर केला आहे. या फोटोमध्ये महाराष्ट्रातल्या विविध घोटाळ्यांविरुद्ध, विरोधी पक्ष नेते म्हणून आवाज उठवणाऱ्या देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर कोण रथी महारथी आहेत बघूया, असे म्हणत त्यांनी टीका केली आहे. अंजली दमानिया यांनी पोस्ट केलेल्या फोटोमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार नारायण राणे, आमदार छगन भुजबळ, प्रफुल्ल पटेल, अशोक चव्हाण तसेच सुनील तटकरे दिसत आहेत. यात अंजली दमानिया यांनी प्रत्येकाच्या नावासमोर घोटाळ्याचे नाव नमूद केले आहे. 1) सिंचन घोटाळा फेम अजित पवार व सुनील तटकरे 2) आदर्श घोटाळा फेम अशोक चव्हाण व नारायण राणे 3) महाराष्ट्र सदन घोटाळा फेम छगन भुजबळ 4) एविएशन घोटाळा फेम प्रफुल्ल पटेल ह्या सगळ्यांना सरकारमध्ये घेऊन भाजप खरोखर भ्रष्टाचार संपवणार ह्यात काहीच शंका नाही., अशी खोचक टीका केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जेव्हा विरोधी पक्ष नेते होते तेव्हा त्यांनी या सगळ्यांच्या विरोधात आवाज उठवला होता. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना अजित पवार हे उपमुख्यमंत्री होते. अंजली दमानिया यांनी यापूर्वी देखील सिंचन घोटाळ्यावरून अजित पवार तसेच सुनील तटकरे यांच्यावर हल्लाबोल केला होता.

# भारतात बिटकॉइनचा व्यापार हवाला व्यवसायाचा नवा मार्ग



**मुंबई** : सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, 'भारतात बिटकॉइनचा व्यापार हा हवाला व्यवसायाच्या नवीन पद्धतीशी व्यवहार करण्यासारखा आहे.' क्रिप्टोकरन्सीचे नियमन करण्यासाठी केंद्र सरकार अद्याप कोणतीही व्यवस्था करू शकलेले नाही याबद्दल न्यायालयाने खेद व्यक्त केला. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि एन. कोटीश्वर सिंह यांच्या खंडपीठाने सांगितले की, न्यायालयाने दोन वर्षांपूर्वी केंद्राला क्रिप्टोकरन्सी व्यापाराबाबतच्या धोरणाची माहिती देण्यास सांगितले होते परंतु अद्यापपर्यंत कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. बेकायदेशीर बिटकॉइन व्यापाराच्या आरोपाखाली अटक केलेल्या एका व्यक्तीच्या जामीन अर्जावर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने ही टिप्पणी केली. त्याच वेळी, याचिकाकर्त्याची बाजू मांडणारे वरिष्ठ वकील मुकुल रोहतगी म्हणाले की, भारतात बिटकॉइनचा व्यापार बेकायदेशीर नाही, कारण सर्वोच्च न्यायालयाने रिझर्व्ह बँकेचे एक परिपत्रक आधीच रद्द केले आहे. गुजरात सरकार आणि ईडी १० दिवसांत उत्तर दाखल करतील. रोहतगी यांनी न्यायालयाला सांगितले की, बिटकॉइनची किंमत खूप जास्त आहे. कोणीही व्यक्ती परदेशातील कोणत्याही शोरूममध्ये जाऊन एका बिटकॉइनने कार खरेदी करू शकते. मी रविवारी तपासले की एका बिटकॉइनची किंमत ८२ लाख रुपये होती.

# विमानात बॉम्ब ठेवल्याची धमकी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**

मुंबई विमानतळावर विमानात बॉम्ब असल्याची धमकी मिळाल्यानंतर सर्व यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. विमानतळ प्राधिकरणाने तात्काळ याबाबतची माहिती सर्व यंत्रणांना दिल्यानंतर विमानाची तपासणी करण्यात आली. पण विमानात काहीही संशयास्पद सापडले नाही. याप्रकरणी धमकीचा दूरध्वनी करणाऱ्या व्यक्तीचा शोध सुरू आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सहार विमानतळ हॉटलाइनवर धमकीचा दूरध्वनी आला होता. त्यात इंडिगो कंपनीच्या विमानाला बॉम्बने उडवण्याची धमकी दूरध्वनी करणाऱ्या व्यक्तीने दिली होती. ते विमान चंदीगडहून मुंबईला येणार होते. रात्री उशिरा विमान मुंबई विमानतळावर उतरले. त्यानंतर विमानतळातील मोकळ्या जागी नेऊन त्याची तपासणी करण्यात आली.

पण विमानात काहीही संशयास्पद सापडलेले नसल्याची माहिती सूत्रांनी दिली. याप्रकरणाची माहिती पोलिसांना देण्यात आली आहे. पोलीस दूरध्वनी करणाऱ्या व्यक्तीचा शोध घेत आहेत. याबाबत गुन्हे शाखाही समांतर तपास करत आहे.

ऑक्टोबर महिन्यापासून देशातील सर्वच विमानतळांवर तसेच विमान कंपन्यांना धमक्यांचे संदेश व दूरध्वनी प्राप्त व्हायला सुरूवात झाली. ऑक्टोबरच्या पहिल्या १५ दिवसांतच धमक्यांच्या प्रमाणात प्रचंड वाढ झाली होती. बहुतांश संदेश समाज माध्यमांद्वारे पाठवण्यात आले असून त्यात विमान कंपन्या, स्थानिक पोलीस, विमानतळ प्राधिकरण यांना ईमेल अथवा संदेश पाठवून धमक्या देण्यात आल्या आहेत.

ऑक्टोबरच्या तिसऱ्या आठवड्यात एकाच दिवसात ८५ नवीन धमक्या आल्या होत्या. तसेच त्यापूर्वी १५ दिवसांतच ७० हून अधिक धमकीचे संदेश प्राप्त झाले होते. प्रत्येक विमानांची व प्रवशांची सुरक्षेच्या दृष्टीने तपासणी करण्यात आली. तपासणीत सर्व धमक्या अथवा संदेश खोटे असल्याचे निष्पन्न झाले.

# पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालयाचा नवा विक्रम
## आयटी विभागाने एकाच दिवसात नोंदवले ७८ कॉपीराईट

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ७ :**




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड रिसर्चने (पीसीसीओईआर) शैक्षणिक क्षेत्रात नवनवीन उपक्रम राबविले असून उत्कृष्ट शैक्षणिक संस्था म्हणून नावलौकिक प्राप्त केला आहे. पीसीसीओईआरने एकाच दिवसात ७८ कॉपी राईटची नोंद करून आणखी एका विक्रमाची नोंद आपल्या नावावर केली आहे.

पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या आयटी विभागाने बौद्धिक संपदा हक्कांमध्ये (आयपीआर) एक उल्लेखनीय टप्पा गाठला. आयटी विभागाच्या प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी ही कामगिरी केली. बौद्धिक संपदा हक्क (आयपीआर) निर्मितीचे संरक्षण कसे करतात आणि योग्य मान्यता कशी सुनिश्चित करतात. आयपीआर व्यक्ती आणि संस्थांना त्यांच्या अद्वितीय कल्पना, शोध आणि कार्यांचे संरक्षण कसे करण्यास सक्षम करते याबद्दल सखोल माहिती दिली. तसेच वेगाने प्रगती करणाऱ्या तंत्रज्ञानाच्या जगात बौद्धिक संपदेचे महत्व प्राचार्य डॉ. हरीश तिवारी यांनी सांगितले.

आयटी विभागाचे प्रमुख डॉ. संतोषकुमार चोबे यांनी प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना कॉपीराइट दाखल करण्यासाठी प्रोत्साहित करून एकाच दिवसात ७८ कॉपीराइट दाखल करून उत्पादनांना सुरक्षित करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले. या उपक्रमाचे समन्वय प्रा. दिव्या पुनवंतवार यांनी केले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# ८ वर्षीय मुलासमोरच बापाने केला खून

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ७ :**

पुण्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. ८ वर्षांच्या मुलासमोरच आपल्या पत्नीचा अत्यंत निर्घृणपणे खून केल्याची घटना घडली आहे. पत्नीच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी जाताना पोलिसांनी आरोपीला पकडले. ही हत्या घरगुती वादातून झाल्याचे समोर आले आहे.

स्वयंपाक करण्यावरून व घरात पैसे न दिल्याच्या कारणावरून पती व पत्नीमध्ये वाद झाले. हा वाद इतका विकोपाला गेला की आरोपी पतीने आपल्या ८ वर्षांच्या मुलासमोरच पत्नीचा गळा दाबून खून केला. त्यानंतर पत्नीचा मृतदेह कपड्यात गुंडाळून विल्हेवाट लावण्यासाठी दुचाकीवरून घेऊन निघाला.

यावेळी रस्त्यातच पोलिसांनी त्याला पकडले. यावेळी चौकशीत आरोपीने उडवाउडवीची उत्तरे दिली. पोलिसांना त्याच्या बोलण्यावर संशय आला व कसून चौकशी सुरू केली. यावेळी पोलिसांनी ८ वर्षांच्या मुलाला विचारले असता, मुलाने घडलेला संपूर्ण प्रकार डोळ्यात पाणी आणत सांगितला आणि आरोपी पतीचे पितळ उघडे पडले.

राकेश निसार असे आरोपीचे नाव आहे तर बाबीता निसार असे मृत महिलेचे नाव आहे. राकेश हा धायरी परिसरात आपल्या कुटुंबासोबत राहत होता व मजूरी काम करायचा. रात्री एकच्या सुमारास स्वामीनारायण मंदिरासमोरून भुमकर पुलाजवळ राकेश आपल्या पत्नीचा मृतदेह घेऊन जात असताना काही लोकांनी पाहिले. येथील नागरिकांना संशय आला व त्यांनी तातडीने पोलिसांना याची कल्पना दिली. यावेळी भुमकर पुलाजवळ बिट मार्शल पोहोचले आणि राकेशला पकडले. यावेळी राकेशने दुचाकी सोडून पळून जाण्याचा प्रयत्न केला.

मृतदेह कोणाचा आहे आणि कुठे घेऊन चालला असा प्रश्न विचारल्यावर राकेशने उडवाउडवीचे उत्तर देण्यास सुरू केले. मित्राने मृतदेह मागवला होता. त्याला खेडशिवपूरजवळ नेऊन देतो असे त्याने सांगितले. तसेच मृत पत्नीने फाशी घेत आत्महत्या केल्याचेही त्याने सांगितले.

पोलिसांना संशय आला व त्यांनी थेट राकेशचे घर गाठले. यावेळी घरात राकेश आणि बबीताचा ८ वर्षांचा मुलगा होता. मुलाकडे चौकशी केली असता मुलाने पोलिसांना सांगितले की वडिलांनीच आईला मारून टाकले. आई आणि वडिलांमध्ये जेवणावरून आणि पैसे देण्याच्या कारणावरून रोज वाद व्हायचे. आज भांडण झाल्यावर बाबांनीच आईला गळा दाबून मारले, असे मुलाने सांगितले.

या संपूर्ण प्रकरणाचा घटनाक्रम सांगताना पोलिस उपायुक्त संदीप सिंह गिल म्हणाले की, लायगुडे मळा परिसरातील समृध्दी सोसायटीत हे जोडपं गेल्या दीड वर्षांपासून राहत होतं. आरोपी राकेशने राहत्या घरात बबीताची हत्या केली. दोघेही मूळचे उत्तर प्रदेश येथील रहिवासी आहेत. दीड वषार्पासून ते पुण्यामध्ये राहायला आलेले होते. घटना घडली त्या दिवशी दोघांमध्ये घरगुती कारणावरून वाद झाला होता. त्यातून राकेशने बबीताचा गळा आवळून खून केल्याची माहिती उपायुक्त गिल यांनी दिली

# अकरावीचे अर्ज भरण्यास १९ मे पासून सुरूवात

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**

बारावीचा निकाल लागल्यानंतर आता दहावीच्या निकालाकडे विद्यार्थी व पालकांचे डोळे लागले आहेत. दहावीच्या निकालाबाबत अद्याप राज्य मंडळाकडून कोणतीही तारीख जाहीर करण्यात आली नसली शिक्षण उपसंचालक कार्यालयामार्फत १९ मे पासून अकरावीच्या प्रवेशासाठी ऑनलाईन नोंदणी प्रक्रियेस सुरुवात होणार आहे. तसेच अकरावी प्रवेशप्रक्रिया गुणवत्ताधिष्ठित, पारदर्शक आणि एकसंध असावी यासाठी यंदापासून संपूर्ण राज्यात उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांमधील अकरावी प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येणार असल्याचे शालेय शिक्षण विभागाकडून जाहीर करण्यात आले आहे. दहावीच्या निकालानंतर अकरावी प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांची धावपळ सुरू होते.

# ज्येष्ठ रंगकर्मी माधव वझे यांचे निधन

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ७ :**



भारतीय रंगभूमी कलाकार, दिग्दर्शक आणि ज्येष्ठ चित्रपट अभिनेते माधव वझे यांचे पुण्यात निधन झाले. ते 85 वर्षांचे होते. 3 इडियट्स, डिअर जिंदगी या सारख्या हिंदी चित्रपटात त्यांच्या भूमिका अजरामर झाल्या आहेत. श्यामची आई या चित्रपटात त्यांनी बालकलाकार म्हणून श्यामची भूमिका साकारली होती.

माधव वझे यांचा जन्म 21 ऑक्टोबर 1939 रोजी झाला होता. एक प्रतिष्ठित भारतीय रंगभूमी कलाकार, दिग्दर्शक आणि चित्रपट अभिनेते म्हणून त्यांची ओळख होती. ते प्रामुख्याने मराठी रंगभूमी आणि चित्रपटांशी संबंधित होते. महाराष्ट्रातील पुणे येथे जन्मलेल्या वझे यांनी श्यामची आई (1053) या मराठी चित्रपटातून बाल कलाकार म्हणून अभिनय प्रवास सुरू केली. ज्यामध्ये त्यांनी श्यामची भूमिका साकारली होती. साने गुरुजींच्या आत्मचरित्रात्मक कामावर आधारित या चित्रपटाला 1954 मध्ये पहिल्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये अखिल भारतीय सर्वोत्कृष्ट वैशिष्ट्यपूर्ण चित्रपटासाठी राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळाले होते. त्यांच्या अभिनयाच्या कामा व्यतिरिक्त, वझे यांनी पुण्यातील नवरोजी वाडिया महाविद्यालयात इंग्रजीचे व्याख्याता म्हणून देखील काम केले.

# पोलिस गस्तीवर क्यू आर कोड पेट्रोलिंगचा वॉच
## मालेगावात आठ पोलिस ठाण्यांतर्गत बसविले ४०० क्यू आर कोड

■ **महासागर प्रतिनिधी, मालेगाव, दि. ७ :**



कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिस प्रशासनाकडून दिवस व रात्रीची गस्त घातली जाते. गस्ती पथके संवेदनशील ठिकाणांना खरंच भेटी देतात का, आपले कर्तव्य प्रामाणिकपणे बजावतात का, यावर लक्ष ठेवण्यासाठी मालेगाव शहरात प्रथमच क्यू आर कोड पेट्रोलिंग या आधुनिक प्रणालीचा वापर सुरू करण्यात आला आहे. शहरातील आठ पोलिस ठाण्यांतर्गत ४०० ठिकाणी कोड बसवण्यात आले आहेत. गस्ती कोड स्कॅन होताच याचा संदेश नियंत्रण कक्षाला ऑनलाईन प्राप्त होणार असल्याने पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रामाणिकपणे गस्त घालावी लागणार आहे.

संवेदनशील ठिकाणे, गर्दीचा भाग, पुतळ्यांचा परिसर, धार्मिक स्थळे, गुन्हेगारी अड्डे या महत्वाच्या ठिकाणी पोलिसांची गस्त सुरुच असते. अशा ठिकाणांना नियमित भेटी देऊन कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेतला जातो. गस्ती पथकातील कर्मचारी भेट दिल्याचा पुरावा म्हणून फोटो काढून व्हॉटसॲप ग्रुपवर टाकत होते.

पथकातील सर्वच कर्मचारी गस्तीत सहभागी होत नसल्याची बाब निदर्शनास येत होती. कामचुकारपणास आळा बसावा, गस्तींचे काम प्रामाणिकपणे व्हावे या हेतूने अपर पोलिस अधीक्षक तेगबीरसिंह संधू यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस अधीक्षक सूरज गुंजाळ यांनी क्यू आर कोड पेट्रोलिंगचा उपक्रम सुरू केला आहे. कॅम्प, छावणी, किल्ला, शहर, आझादनगर, रमजानपुरा, पवारवाडी व आयशानगर या पोलिस ठाण्याच्या क्षेत्रात ४०० क्यू आर कोड लावण्यात आले आहेत. ऑनलाईन असलेल्या या उपक्रमासाठी एक बेव पेज रजिस्ट्रेशन तयार केले आहे. गस्ती पथकातील कर्मचाऱ्यांनी भेट देताना हा क्यू आर कोड स्कॅन करणे बंधनकारक आहे. कोड स्कॅन झाल्यानंतर याचा संदेश नियंत्रण कक्षाला प्राप्त होईल. किती ठिकाणचे कोड स्कॅन झाले किंवा नाही यावरून पथकांचे काम दिसून येईल.

सराईत गुन्हेगारांची नियमित झाडाझडती घेतली जात असते. गुन्हेगारी कारवाया रोखण्यासाठी पोलिस गुन्हेगारांच्या घरी जाऊन त्यांची नोंद घेत असतात. ही नोंद प्रक्रिया पारदर्शकपणे व्हावी म्हणून गुन्हेगारांच्या घराबाहेरही एक क्यू आर कोड लावला जाणार आहे. जो कर्मचारी झाडाझडतीसाठी जाईल त्याला हा कोड स्कॅन करुन अहवाल सादर करावा लागणार आहे.

# राज्यातील पीएमश्री शाळांमध्ये मुख्याध्यापक, शिक्षकांची पदभरती

**पुणे** : राज्यातील पीएमश्री शाळांमध्ये मुख्याध्यापक, शिक्षकांची वर्गनिहाय, विषयनिहाय पदे भरण्याचे निर्देश महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने दिले आहेत. नियुक्त करण्यात येणारे मुख्याध्यापक, शिक्षक हे चार ते पाच वर्ष संबंधित पीएमश्री शाळांमध्ये नियमित राहतील असेही स्पष्ट करण्यात आले आहे. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार केंद्र शासन पुरस्कृत पीएमश्री योजनेअंतर्गत राज्यातील ८२७ शाळांची निवड करण्यात आली आहे.

या शाळा उत्तम गुणवत्तेच्या दृष्टीने मार्गदर्शक ठरतील अशा पद्धतीने विकसित केल्या जाणार आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील तरतुदींची पीएमश्री शाळांमध्ये प्रभावी अंमलबजावणी केली जाणार आहे. पीएमश्री शाळांना नजीकच्या शाळांना शाळांना समानता, समतापूर्ण आणि आनंदायी वातावरणात उच्च गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी मार्गदर्शक शाळा म्हणून नेतृत्व करण्याच्या दृष्टीने तयार करण्यात येणार आहे. पालक, शिक्षक, विद्यार्थ्यांमध्ये उत्तम सहसंबंध प्रस्थापित करून त्यांचा सहभाग आणि शिक्षणासाठी आनंदपूर्ण वातावरण निर्मिती करणे, तसेच विविध प्रशिक्षणामध्ये सहभागी होणे, प्रशिक्षण आणि कार्यशाळा आयोजित करणे यात मुख्याध्यापकांची महत्त्वपूर्ण भूमिका, जबाबदारी आहे.

# पुणे परिमंडळात थकबाकीदार ग्राहकांवर कारवाई
## ४१ हजार ७९१ ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ७ :**



वीजबिलांची थकबाकी वाढण्यास पुन्हा सुरवात झाली आहे. त्यामुळे थकीत वीजबिलांच्या वसूलीला वेग द्यावा. तसेच नवीन वीजजोडण्या देण्यासह नाव बदलण्याच्या अर्जांवर कार्यवाही करण्याचा वेग आणखी वाढवावा असे निर्देश पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनील काकडे यांनी दिले.

महावितरणच्या पुणे परिमंडलाची आढावा बैठक गणेशखिंड येथील प्रकाशभवनमध्ये झाली. यावेळी मुख्य अभियंता काकडे बोलत होते. याप्रसंगी अधीक्षक अभियंते सिंहाजीराव गायकवाड, युवराज जरग,ज्ञानदेव पडळकर, संजीव नेहेते यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुणे परिमंडलात लघुदाब वर्गवारीमधील घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक ग्राहकांकडे गेल्या मार्चमध्ये ६९ कोटी रूपयांची थकबाकी होती. त्यापैकी २२ कोटी ५४ लाख रुपयांच्या थकीत बिलांचा भरणा संबंधित ग्राहकांनी केला आहे. तर ४१ हजार ७९१ ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे. उर्वरित ४६ कोटी ४६ लाख रुपयांची थकबाकी वसूलीसह थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यास आणखी वेग द्यावा, असे निर्देश मुख्य अभियंता सुनील काकडे यांनी दिले.

पायाभूत वीजयंत्रणा अस्तित्वात आहे अशी ठिकाणी नवीन वीजजोडणी तत्परतेने देण्यात यावी. तसेच मालकी बदलल्यानंतर वीजबिलांत नाव बदलांचे तसेच पत्ता बदल किंवा वीजभार वाढीचे अर्ज ग्राहकांकडून ऑनलाइन प्राप्त होतात. या अर्जांवर तातडीने कार्यवाही करण्यात यावी. काही कागदपत्रांची कमतरता किंवा आवश्यकता असल्यास अर्ज नामंजूर करण्याआधी संबंधित ग्राहकांना तातडीने कळवून त्याची पूर्तता करावी. नवीन वीजजोडणी, वीजबिलांच्या तक्रारींसह इतर सर्व सेवा ग्राहकसेवेच्या कृती मानकांनुसार निश्चित केलेल्या कालावधीमध्ये देण्यात याव्यात व यासाठी संबंधित विभागांच्या कार्यकारी अभियंत्यांनी दैनंदिन पर्यवेक्षण करावे असे स्पष्ट निर्देश मुख्य अभियंता काकडे यांनी दिले. यासोबतच वीज वापर कमी दिसून येत आहे अशा व्यावसायिक व औद्योगिक वीजजोडण्यांची तातडीने तपासणी करण्याची सूचना त्यांनी केली.विजेच्या अधिक मागणीच्या कालावधीमध्ये अतिभारित होणाऱ्या वीजवाहिन्यांच्या विभाजनाच्या कामांचा काकडे यांनी आढावा घेतला. तसेच उपस्थित संबंधित एजन्सीजच्या अधिकाऱ्यांना याबाबतची सर्व कामे लवकरात लवकर करण्याचे निर्देश दिले. या बैठकीला सर्व कार्यकारी अभियंते, उपविभाग कार्यालयप्रमुख अभियंते, वरिष्ठ अधिकारी आदींची उपस्थिती होती.

# जिहादी जनरल..




**इंडिया कॉलिंग**
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

पाकिस्तानच्या लष्कर प्रमुखांनी भारताच्या विरोधात काही प्रक्षोभक आणि चिथावणीखोर वक्तव्ये केल्यानंतर काही दिवसांतच काश्मीरमधील पहलगाम येथे हत्याकांड घडले. दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ पर्यटकांची पॉइंट ब्लँक हत्या झाली.

पहलगाम हत्याकांडानंतर देशातून सर्वस्तरातून पाकिस्तानच्या विरोधात संताप आणि आक्रोश प्रकट झाला. पाकिस्तानला कायमचा धडा शिकवा म्हणून लोक रस्त्यावर उतरले. दहशतवादाला फूस कोणाची? पाकिस्तानचे लष्कर प्रमुख जनरल असिम मुनीर यांच्या नावाचीही चर्चा सुरू झाली. दहशतवादी हत्याकांड कोणी घडवले? पहलगाम हत्याकांडाचा मास्टरमाईंड कोण? दहशतवाद्यांना एके ४७ देऊन पहलगाममध्ये कोणी पाठवले?

याची उत्तरे शोधताना असिम मुनीर यांनी भारतावर गरळ ओकणारी व काश्मीरच्या फुटीरतावाद्यांना उत्तेजन देणारी जी वक्तव्ये केली, त्याकडे दुर्लक्ष कसे करता येईल? असिम मुनीर हे पाकिस्तानचे शक्तिशाली लष्कर प्रमुख आहेत. ते कट्टरतावादी आहेत. जिहादी जनरल किंवा मुल्ला जनरल अशी त्यांची प्रतिमा आहे.

असिम मुनीर म्हणतात, (१) पाकिस्तानची निर्मिती हिंदू विरोधातील द्वेषामुळे झाली. कुराणातील कलमाच्या आधारावर दोनच राष्ट्रे निर्माण झाली. पाकिस्तान आणि रियासत ए तोयबा. (२) हिंदू आणि मुस्लिमांमध्ये फरक आहे. जगातील कोणतीही शक्ती काश्मीरला पाकिस्तानपासून वेगळे करू शकत नाही. (३) पाकिस्तान त्यांच्या काश्मिरी भावांना एकटे सोडणार नाही. (४) काश्मीर ही पाकिस्तानच्या गळ्यातील नस आहे.

काश्मीर खोऱ्यात रक्तपात घडविणारे दहशतवादी पाकिस्तानी लष्कराकडून प्रशिक्षित असतात हे वेळोवेळी उघडकीस आले आहे. पाकिस्तानचे लष्कर प्रमुख असिम मुनीर यांनी काश्मीर ही आमची जीवनदायी नस आहे, असे वक्तव्य करून भारताला एकप्रकारे इशाराच दिलेला आहे. एका देशाचा लष्कर प्रमुख अशी वक्तव्ये कशी करू शकतो?

पण पाकिस्तानात आपणच श्रेष्ठ व शक्तिमान आहोत, हे जगाला दाखविण्याचा जनरल असिम मुनीर यांचा प्रयत्न असावा. असिम मुनीर यांचे वडील एका शाळेत मुख्याध्यापक होते. स्थानिक मशिदीचे ते इमामही होते. मुनीर यांचे प्राथमिक शिक्षण मदरशातून झाले. मांगला येथील ऑफिसर्स ट्रेनिंग स्कूलमधे प्रशिक्षण घेऊन त्यांनी सैन्यात प्रवेश केला. झिया उल हक हे लष्कर प्रमुख असताना त्यांनी सैन्याला जिहादी चेहरा देण्याचा प्रयत्न केला.

भारताशी युद्ध करताना त्याला धर्मयुद्धाची जोड मिळाली पाहिजे असा झियांनी प्रयत्न केला. मुनीर यांच्यावरही इस्लामिक वर्चस्वाचा प्रभाव आहे. सौदी अरेबियात काम करीत असताना त्यांनी कुराण तोंडपाठ म्हणून दाखवले होते. त्याबद्दल त्यांना हाफिज ए कोरान हा किताबही देण्यात आला होता.

त्यांच्या भाषणात नेहमीच इस्लामची उदाहरणे आणि कुराणातील कलमांचा समावेश असतो. असिम मुनीर यांनी पाकिस्तानच्या गुप्तचर यंत्रणेचे प्रमुख म्हणून काम केले आहे. इस्लामाबाद येथील नॅशनल डिफेन्स युनिव्हर्सिटीतून स्ट्रॅटेजिक मॅनेजमेंटमध्ये त्यांनी पदव्युत्तर पदवी घेतली आहे.

संरक्षण व्यवस्था मजबूत करण्यासाठी त्यांनी सौदी अरेबियात काम केले आहे. असिम मुनीर यांनी काश्मीरचा मुद्दा अचानक उपस्थित केला आणि त्यानंतर काश्मीर खोऱ्यात मोठे हत्याकांड घडले व त्यात हिंदू पर्यटकांना टिपून मारले. साठ वर्षांच्या असिम मुनीर यांची २०२२ मध्ये पाकिस्तानच्या लष्कराचे प्रमुख पदावर नियुक्ती झाली.

अगोदर ते आठ महिने पाकिस्तानच्या आयएसआय या गुप्तचर संस्थेचे प्रमुख होते.इम्रान खान पंतप्रधान असताना असिम मुनीर यांना आयएसआय प्रमुख पदावरून हटवले. जनरल असिम मुनीर हे पाकिस्तानमधील लष्कराच्या सर्वोच्च पदावर आहेत व भ्रष्टाचाराच्या आरोपावरून इम्रान खान जेलमध्ये आहेत.

५ फेब्रुवारी रोजी काश्मीर एकता दिनाच्या कार्यक्रमात मुझफ्फराबादमध्ये बोलताना जनरल मुनीर म्हणाले, पाकिस्तानने काश्मीरसाठी आजवर तीन युद्धे लढली आहेत. गरज पडल्यास आणखी दहा युद्धे लढण्याची पाकिस्तानची तयारी आहे.

पाकिस्तानच्या सिनेट सदस्य पलावाशा मोहम्मद झई या भारतावर गरळ ओकण्यात माहीर आहेत. त्या म्हणतात, अयोध्येतील बाबरी मशिदीची पहिली वीट पाकिस्तानी सैन्याकडूनच रचली जाईल. पहिली अझान असिम मुनीर देतील.

पलावशा यांनी व्हेनेझुएलाचे दिवंगत राष्ट्रप्रमुखांच्या वक्तव्याचा दाखला दिला आहे. त्या म्हणतात, आपल्याकडे बंदुका आहेत, आपल्याकडे शस्त्रे आहेत. आपल्याकडे झाडे आहेत. जर शत्रूच्या सैन्याने काहीही (हल्ला) केले, तर आम्ही त्यांचे मृतदेह आपल्या झाडांवर लटकवू...

शीख सैन्य पाकिस्तानवर हल्ला करणार नाही, कारण त्यांच्यासाठी ही गुरू नानकांची भूमी आहे, आपले सैन्य ६-७ लाख नाही, तर २५ कोटी जनता सैन्याबरोबर खांद्याला खांदा लावून उभी राहील, अशीही दर्पोक्ती पलवाशा यांनी केली आहे. पलवाशा या सत्ताधारी बिलावल भुत्तो झरदारी यांच्या पाकिस्तान पीपल्स पार्टीत आहेत.

पक्षाच्या माहिती सचिव आहेत. त्या सिंधचे प्रतिनिधीत्व करतात. भारताने सिंधू नदीचे पाणी बंद केले जाईल असा इशारा पाकिस्तानला दिल्यानंतर बिलावल भुत्तो झरदारी म्हणाले, सिंधू आमची आहे. आमची राहील. एक तर आमचे पाणी त्यातून वाहील नाही, तर भारतीयांचे रक्त वाहील....

पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा असीफ यांनी तर पहलगाम हल्ल्याशी पाकिस्तानचा काहीही संबंध नाही असे सांगताना भारताने सिंधू नदीवर धरण बांधले, तर पाकिस्तान हल्ला करील अशी भारताला धमकी दिली आहे. पाकिस्तानी लष्कर प्रमुख जनरल असिम मुनीर यांच्या सुरात सूर मिसळून भारताच्या विरोधात भडक बोलण्याची पाकिस्तानमधे जणू शर्यत लागली आहे. त्यांच्या चिथावणीखोर भाषणांमुळेत दोन्ही देशांत युद्धजन्य वातावरण निर्माण झाले आहे.

पाकिस्तानस्थित लष्कर ए तोयबाशी हमासचे कसे संबंध आहेत, त्याचे व्हीडिओ सोशल मीडियावर पोस्ट झाले आहेत.

दहशतवादी संघटनाचे नेते रोज भारताला कसे धमक्या देत आहेत, पाकिस्तानमधील विविध पक्षांचे नेते आणि धार्मिक नेते भारताविरोधात कशी गरळ ओकत आहेत, त्याच्याही क्लिप्स सोशल मीडियावर फिरत आहेत. भारताने पाकिस्तानला सिंधू नदीचे पाणी स्थगित करण्याची धमकी दिली व पाठोपाठ चिनाब नदीचे पाकिस्तानात वाहून जाणारे पाणीही थांबवले.

पाकिस्तानातून येणाऱ्या आयातीवर बंदी घालण्यात आली. भारतात राहात असलेल्या हजारो पाकिस्तानी नागरीकांची मायदेशी पाठवणी केली. पाकिस्तानी विमानांना भारताने आपले हवाई क्षेत्र बंद केले. अटारी व वाघा या सीमा भारत सरकारने सील केल्यात. पाकिस्तानला जाणारी टपाल सेवाही बंद झाली. पाकिस्तानातून समुद्रमार्गे येणाऱ्या बोटींना मनाई केली.

भारतात वास्तव्य असलेल्या पाकिस्तानी नागरीकांची शोध मोहीम तपास यंत्रणांनी सुरू केली. भारताने घेतलेल्या कठोर निर्णयांमुळे पाकिस्तानची चोहोबाजूने आर्थिक कोंडी होऊ लागली आहे. दुसरीकडे पाकव्याप्त काश्मीरमधील जनतेला व काश्मिरी सीमेवर राहणाऱ्या लोकांना घरात दोन महिने पुरेल एवढे अन्न-धान्याचा साठा (रेशन) करून ठेवावे, असे फर्मान पाकिस्तान सरकारने काढले आहे.

पाकव्याप्त काश्मीरचे पंतप्रधान चौधरी अन्वरूल यांनी तर तेरा मतदारसंघात दोन महिन्यांचे रेशन साठा करून ठेवायला सांगितले आहे. एक लाख अब्ज रुपयांचा आपत्कालीन निधी उभारण्यात आला आहे. प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या आत सैन्य तैनात करण्यात आले आहे.

पाकव्याप्त काश्मीरमधील एक हजार मदरसे दहा दिवसांसाठी बंद ठेवले आहेत. भारत सरकारमधील कोण ना कोण मंत्री किंवा उच्च पदस्थ, चुन चुन के मारेंगे अशा धमक्या पाकिस्तानला व दहशतवाद्यांना देत आहेत. भारत सरकारने सर्व राज्यांत नागरीकांना स्वसंरक्षणासाठी प्रशिक्षणाचा भाग म्हणून मॉक ड्रीलचा आदेश जारी केला.

पहलगाम हल्ल्यानंतर केंद्र सरकारने दिल्लीत २४ एप्रिल रोजी सर्व पक्षीय बैठक बोलावली होती. त्यात गृहमंत्रालयाने सादरीकरण केले. जून २०१४ ते २०१४ या काळात १६४३ दहशतवादी हल्ले झाले, १९२५ घुसखोरीचे प्रयत्न झाले. ५७६ सुरक्षा सैनिक ठार झाले, अशी आकडेवारी आहे. पठाणकोट, पुलवामा, पगलगाम ही मालिका थांबलेली नाही.

अशा मोठ्या दहशतवादी हल्ल्यांनंतरही पाकिस्तानला अद्दल घडविण्यात आपण कुठे कमी पडतोय का? भारताच्या तुलनेने पाकिस्तान खूप छोटा देश आहे. भारताचे लष्करी सामर्थ्य किती तरी प्रचंड आहे. मग वारंवार दहशतवादी हल्ले का चालू राहतात? निरपराध भारतीयांचे त्यात का बळी जातात? पाकिस्तानने दहशवादी हल्ले करायचे आणि भारतीय जनतेने मॉक ड्रिल करायचे, हे किती दिवस चालू राहणार? पाकिस्तानला जबरदस्त धडा शिकवावा, हीच जनभावना आहे.

४४ सुरक्षा सैनिकांचे बळी घेणाऱ्या पुलवामा हल्ल्यातील दहशवाद्यांचे काय झाले हे कळले नाही. आता २६ पर्यटकांचे हत्याकांड घडविणाऱ्या पहलगाम हल्ल्याचे दहशतवादी कुठे गेले हेही समजले नाही...

■ ■ ■

# घोड्यांच्या ट्रॅमचे युग समाप्त!

सुरुवातीला ट्रॅमगाड्या घोडे ओढत असत. नंतर त्या वीजेवर चालविण्यात आल्या. मुंबई वीज पुरवठा आणि ट्रॅमवेज कंपनी मर्यादितने मुंबई ट्रॅमवेज कंपनी विकत घेतली. हीच आताच्या बेस्टची मूळ कंपनी होय. ७ मे १९०७ रोजी पहिली विजेवरची ट्रॅम धावली. सन १९२० साली दुमजली ट्रॅमसेवा चालू झाली. सन १९२४ पासून रेल्वे वीजेवर चालू लागली होती तर सन १९२६ साली बससेवा चालू झाली. बस व रेल्वे सेवा जलद गतीने असल्याने ट्रॅमसेवा तोट्यात गेली. शेवटी ट्रॅमसेवा बंद करण्यात आली.



ट्रॅम हे विजेवर चालणारे पूर्वीचे वाहन आहे. यासाठी रस्त्यातच रूळ टाकलेले असतात. या वाहनामुळे वाहतूक कोंडी होवू शकते. तसेच यांचा वेगही मर्यादित असतो. भारतात पूर्वी मुंबई येथे ट्रॅम सेवा होती. तसेच कलकत्ता येथेही ट्रॅम धावत असत. युरोपमधले अनेक देश तसेच ऑस्ट्रेलियातील काही शहरे येथे ट्रॅम हे सार्वजनिक वाहतुकीचे साधन म्हणून वापरले जाते.

ट्रॅमसेवा ही मुंबई शहरातील पहिली सार्वजनिक वाहतूक व्यवस्था होय. मुंबईत दि. १९ मे १८७४ रोजी पहिली ट्रॅमसेवा चालू झाली. मुंबई ट्रामवे कंपनी, मुंबई महानगरपालिका आणि मुंबई सरकार यांच्यात करार होऊन तिचे नियोजन झाले. सुरुवातीला ट्रॅमगाड्या घोडे ओढत असत. नंतर त्या वीजेवर चालविण्यात आल्या.

मुंबई वीज पुरवठा आणि ट्रॅमवेज कंपनी मर्यादितने मुंबई ट्रॅमवेज कंपनी विकत घेतली. हीच आताच्या बेस्टची मूळ कंपनी होय. दि.७ मे १९०७ रोजी पहिली विजेवरची ट्रॅम धावली. सन १९२० साली दुमजली ट्रॅमसेवा चालू झाली. सन १९२४ पासून रेल्वे वीजेवर चालू लागली होती तर सन १९२६ साली बससेवा चालू झाली. बस व रेल्वे सेवा जलद गतीने असल्याने ट्रॅमसेवा तोट्यात गेली. शेवटी ट्रॅमसेवा बंद करण्यात आली.

दि. ३१ मार्च १९६४ रोजी रात्री १० वाजता बोरिबंदर ते दादर शेवटची ट्रॅमगाडी धावली. त्या शेवटच्या दिवशी हजारो मुंबईकरांनी तिला दुतर्फा प्रचंड गर्दी करून हळहळत निरोप दिला होता. त्यादिवशी ७१,९४७ प्रवाश्यांनी ट्रॅममधून प्रवास केला. त्याचे उत्पन्न ४,२६० रुपये होते. सुरुवातीला एक आण्यात कुठेही प्रवास करायची सुविधा होती. नंतर दीड आणा आणि नंतर दोन आणे तिकीट झाले.

माटुंगा सर्वात दूरचे स्थानक होते. सहा नंबरची ट्रॅमगाडी फोरासमार्गे कुलाबा ते गिरगाव धावायची. चालकाजवळ पायापाशी वर्दी देण्यासाठी घंटा असायची. ससून डॉक ते छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, वाडीबंदर, लालबाग, जेकब सर्कल, ताडदेव, ऑपेरा हाऊस, ग्रॅंटरोड ते जेजे हॉस्पिटल, धोबीतलाव ते कर्नाटक बंदर असे शहरभर जाळे होते. ट्रॅम गोल फिरून वळायची आणि उलट दिशेने धावायची. आताच्या गोलाकार बागा या तेव्हाची ट्रॅमची स्थानके होती. किंग्ज सर्कल, सायन सर्कल, दादर टीटी ट्रॅम टर्मिनस ही त्यातील काही ठिकाणे होत.

बा. सी. मर्ढेकरांच्या खालील शब्दात ती अजरामर झाली आहे.

जिथे मारते कांदेवाडी टांग जराशी
ठाकुरद्वारा
खडखडते अन् ट्राम वाकडी,
कंबर मोडुनी, चाटित तारा.....

मुंबईत कुलाबा ते क्रॉफर्ड मार्केट या मार्गावर पहिली विजेवर चालणारी ट्रॅमगाडी सुरू झाली आणि घोड्यांच्या ट्रॅमचे युग समाप्त झाले. मुंबई शहरात ट्रॅम धावत होती, हे आजच्या पिढीला ज्ञात नाही.

दि. ९ मे १८७४ रोजी मुंबईत घोड्यांनी ओढल्या जाणाऱ्या ट्रॅम सुरू झाल्या होत्या. घोड्याची ट्रॅम सुरु होण्यापूर्वी मुंबईत मुख्य वाहतुकीचे साधन म्हणजे मेणे व छकडे होते. घोड्याने चालवलेला टांगा हे वाहन सन १८८०मध्ये मुंबईत प्रथम आले. अस्सल मुंबईकर याला टांगा म्हणण्यापेक्षा व्हिक्टोरिया हे भारदस्त इंग्रजी नावं देत असत. कुलाबा ते क्रॉफर्ड मार्केट, पायधुनी ते बोरीबंदर आणि बोरीबंदर ते काळबादेवी- पायधुनी या मार्गावर घोड्यांनी ट्रॅम खेचली.

पहिल्याच दिवशी ४४ घोड्यांसह ६ ट्रॅमगाड्यांनी ४३ फेऱ्या केल्या. ४५१ प्रवाशांकडून ८४ रुपये ९ पैसे जमा झाले. ट्रॅम ओढण्यासाठी आणलेल्या विलायती घोड्यांना उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून त्यांना टोप्या घालत असत. या ट्रॅममध्ये कंडक्टर असायचा पण तिकीटं नसायची. त्यावेळी कोणी प्रवासी फुकट म्हणजे पैसे न देता प्रवास करणारा आहे की नाही हे तपासून पाहिलेच नव्हते.

एवढेच नव्हे कंडक्टर जे काही पैसे गोळा करत होते, ते बरोबर कंपनीकडे जमा करत होते की नाही, याचाही काही बंदोबस्त केलेला नव्हता. पण हा मामला फार काळ टिकला नाही. चार महिन्यांनंतर ट्रॅमच्या तिकिटांची कल्पना सुचली आणि ट्रॅमचं उत्पन्न वाढू लागलं. उत्पन्न वाढू लागल्यावर ट्रॅमचं तिकीट कमी करुन एक आणा करण्याचं औदार्य त्या काळच्या सरकारनं दाखवलं.

ही ट्रॅमसेवा सुमारे ३१ वर्षे सुरू होती. दि. ९ मे १८७४ पासून दि.७ मे १९०७ पर्यंत एकतीस वर्षांनंतर शेवटच्या दिवशी जेव्हा साधी ट्रॅम बंद झाली, त्यादिवशी ७१ हजार ९७४ प्रवाशांनी ट्रॅममधून प्रवास केला. ४२६० इतकं उत्पन्न त्यादिवशी जमा झालं. म्युझियम ते ससून डॉक, लालबाग, जेकब सर्कल, ऑपेरा हाऊस, करनॅक बंदर ते धोबी तलाव, जेजे हॉस्पिटल ते ग्रॅंट रोड या मार्गावर त्यावेळी ट्रॅम धावायची. म्युझियमपासून दादरपर्यंतचा प्रवास त्याकाळी फक्त दीड आण्यात व्हायचा.

सन १९०५ मध्ये बॉम्बे इलेक्ट्रिक सप्लाय ॲण्ड ट्रॅम्वेज कंपनी लिमिटेड ही कंपनी म्युनिसिपालिटीने विकत घेतली. ७ मे १९०७ ला वीजेवर चालणारी ट्रॅमगाडी सुरू झाली. पहिली ट्रॅमगाडी लंडनच्या ब्रश इलेक्ट्रिकल कंपनीने दिली होती. त्यावेळी ट्रॅमगाड्यांमध्ये उभं राहण्याची व्यवस्था होती आणि अप्पर क्लास आणि लोवर क्लास अशी विभागणी करण्यात आली होती. पण पहिल्याच दिवशी मालवणकर नावाचे प्रवासी ट्रॅममधून रुळांवर पडले आणि त्यांचा पाय तुटला. कालांतरानं ट्रॅममध्ये उभं राहायला म्युनिसिपाल्टीनं बंदी घातली आणि सन १९२० साली दुमजली ट्रॅम सुरू झाली. नंतर बोरीबंदर ते जे. जे. हॉस्पिटल आणि राणीची बाग अशी ट्रॅमगाडी धावू लागली.



कृष्णकुमार आनंदी गोविंदा निकोडे
गडचिरोली.
९४२३७१४८८३

**(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)**

■ ■ ■

# घर में घुस के मारा..

२२ एप्रिल रोजी पहलगाम येथे पाक पुरस्कृत दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप पर्यटकांचा मृत्यू झाला या भ्याड हल्ल्यानंतर संपूर्ण भारतात संतापाची लाट उसळली. दहशतवाद्यांनी केलेला हा भ्याड हल्ला पर्यटकांवर नव्हता तर भारताच्या सार्वभौमत्वावर होता. त्यामुळे भारत पाकिस्तानच्या या भ्याड हल्ल्यास कधी चोख प्रतिउत्तर देणार? असा प्रश्न विचारला जात होता. याचे उत्तर बुधवारी मिळाले.

बुधवार ७ मे रोजी मध्यरात्री १ वाजून २८ मिनिटांनी भारतीय वायू दलाने पाकव्याप्त काश्मीरवर हवाई हल्ले केले. भारतीय हवाई दलाने केलेल्या या हल्ल्यात पाकव्याप्त काश्मीरमधील नऊ दहशतवादी तळावर हल्ले करून दहशतवाद्यांचे कंबरडे मोडले. भारतीय हवाई दलाने केलेल्या या हल्ल्यात शेकडो दहशतवादी ठार झाले आहेत. नेका आकडा समोर आला नसला तरी या हल्ल्यात १०० पेक्षा अधिक दहशतवादी ठार झाल्याची शक्यता असून यात लष्कर ए तोयबा आणि जैश ए मोहम्मदचे अनेक मोठे दहशतवादी ठार झाले आहेत.

भारतीय हवाई दलाने जवळपास २३ मिनिटे हल्ले केले. भारताने केलेल्या हवाई हल्ल्याला ऑपरेशन सिन्दुर असे नाव देण्यात आले. पहलगाम येथे झालेल्या भ्याड हल्ल्यात ज्या भारतीय महिलांचे कुंकू (सिन्दुर) पुसले गेले त्या महिलांच्या सन्मानार्थ या मोहिमेला लष्कराने ऑपरेशन सिन्दुर असे नाव दिले.

ऑपरेशन सिन्दुर यशस्वी करून भारतीय सैन्याने पहलगाम येथे मरण पावलेल्या २६ पर्यटकांच्या हत्येचा बदला घेतला आहे. भारतीय सैन्याची ही कामगिरी अभिमानास्पद आहे. पाकिस्तानला जशास तसे उत्तर देणाऱ्या भारतीय सैन्याच्या या गौरवपूर्ण कामगिरीने १५० कोटी भारतीयांची मान अभिमानाने उंचावली आहे.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

भारतीय सैन्याच्या या कामगिरीचा देशवासीयांना सार्थ अभिमान असून १५० कोटी भारतीय भारतीय सैन्यदलापुढे नतमस्तक आहे. जो भारताकडे तिरक्या नजरेने पाहिल त्याला भारत घरात घुसून मारेल असा इशाराच भारताने जगाला दिला आहे. भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणाऱ्यांची गय केली जाणार नाही. ॲक्शनला रिॲक्शन मिळणारच. हा २०२५ चा भारत आहे हे भारताने पाकिस्तानला पुन्हा एकदा दाखवून दिले आहे.

ही मोहीम यशस्वी करून भारतीय सैन्यदलाने आपले सामर्थ्य जगाला दाखवून दिले आहे. अर्थात भारताने पाकव्याप्त काश्मीरवर केलेला हा पहिला हवाई हल्ला नाही. या आधी २०१६ आणि २०१९ साली भारताने असाच हवाई हल्ला करून पाकिस्तानला इशारा दिला होता.

मात्र दोनदा हवाई हल्ले झाल्यानंतर देखील पाकिस्तानची खोड मोडली नाही. पाकिस्तानने दहशतवाद्यांना आर्थिक आणि लष्करी मदत करणे चालूच ठेवले त्याचे परिणाम पाकिस्तानला भोगावे लागले.

आता तरी पाकिस्तानने शहाणे व्हावे व दहशतवाद्यांना केली जाणारी लष्करी व आर्थिक मदत थांबवावी नाही तर भारत यापेक्षाही मोठी कारवाई करेल. १९७१ साली भारताने पाकिस्तानचे दोन तुकडे केले जर पाकिस्तानने आपली खोड मोडली नाही तर भविष्यात पाकिस्तानचे चार तुकडे होतील.

भारताने पाकव्याप्त काश्मीरवर केलेल्या या हवाई हल्ल्याला पाकिस्तान कसे उत्तर देईल हे पाहावे लागेल. अर्थात या हवाई हल्ल्याला पाकिस्तानने प्रतिउत्तर दिले तर ती पाकिस्तानची सर्वात मोठी चूक ठरेल.

जर पाकिस्तानने तसे केले तर भारत - पाकिस्तान युद्धाला तोंडच फुटेल. भारत पाकिस्तान युद्धाला तोंड फुटले तर पाकिस्तान जगाच्या नकाशावरून गायब होऊ शकतो याचे भान पाकिस्तानने ठेवावे. पाकिस्तानने चीनच्या भरवश्यावर भारताशी दोन हात करू नयेत कारण आजचा भारत हा चीनलाही जशास तसे उत्तर देण्यास सक्षम आहे. चीननेही पाकिस्तानची बाजू लावून धरू नये कारण दहशतवादाविरुद्धच्या या युद्धात भारताला अनेक देशांची साथ आहे.

अमेरिका, इस्त्राईल, जपान, रशिया या देशांनी आताच भारताला पूर्ण पाठिंबा दिला आहे. पाकिस्तानला जरी तुर्कस्तान, मलेशिया आणि काही इस्लामिक राष्ट्रांनी पाठिंबा दिला असला तरी जगातील सर्व प्रमुख देश भारतच्या बाजूने आहे हे पाकिस्तानने विसरू नये.

पाकिस्तानने जर पुन्हा भारताची कुरापत काढली तर त्याची शिक्षा पाकिस्तानला मिळेलच यात शंका नाही. ऑपरेशन सिन्दुर यशस्वी करणाऱ्या भारताच्या सैन्यदलाला सॅल्युट! जयहिंद !!

■ ■ ■

# वेस्टर्न डिस्टर्बन्सचा पॅटर्न बदलला



पश्चिमी विक्षोभाच्या बदलत्या स्वरूपाचा हवामानावर सर्वाधिक परिणाम होऊ लागला आहे. हिमालयात साधारणपणे जानेवारी-फेब्रुवारीमध्ये होणारा बर्फवृष्टी मार्च-एप्रिलमध्ये सुरू झाली आहे.

गेल्या दोन वर्षांतील सर्वाधिक बर्फवृष्टी मार्चमध्ये होते. यामुळे उष्णतेच्या लाटांचे प्रमाण कमी होत आहे. हवामान बदलाचा अभ्यास करणाऱ्या क्लायमेट ट्रेंड्स या संस्थेने ही माहिती दिली आहे. हिवाळ्यात पश्चिमेकडून येणाऱ्या वादळांना पश्चिमी विक्षोभ म्हणतात. काही वर्षांपूर्वीपर्यंत, नोव्हेंबर ते फेब्रुवारी दरम्यान सर्वाधिक अशांतता येत असे. तथापि, गेल्या चार-पाच वर्षांत, जानेवारी-फेब्रुवारीमध्ये त्यांची क्रिया कमी झाली आहे आणि मार्च-एप्रिलमध्ये वाढली आहे.

मार्चपासून जागतिक तापमानवाढीमुळे पश्चिम आणि वायव्य भारतात उष्णतेच्या लाटा येत आहेत, तर पश्चिमी विक्षोभ तापमान कमी करून उष्णतेच्या लाटेच्या काळात ब्रेक आणत आहेत.

आयएमडीचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा म्हणतात की ही हवामान बदलाची सुरुवात असू शकते. तथापि, जोपर्यंत हवामानातील बदल दोन ते तीन दशकांपर्यंत स्थिर राहत नाही तोपर्यंत तो एक घटना मानला पाहिजे.

जानेवारी-फेब्रुवारी २०२३ मध्ये १२ पश्चिमी विक्षोभ होते. त्यापैकी ४ जानेवारीमध्ये सक्रिय होते. यामुळे डोंगरावर बर्फवृष्टी झाली आणि मैदानी भागात पाऊस पडला. मार्च-एप्रिलमध्ये आलेले सर्व १२ जण सक्रिय होते.

जानेवारी-फेब्रुवारी २०२४ मध्ये १२ आले, फक्त ७ सक्रिय होते. १२ पैकी १० मार्च-एप्रिलमध्ये सक्रिय होते. जानेवारी-फेब्रुवारी २०२५ मध्ये १४ पश्चिमी विक्षोभ निर्माण झाले होते, त्यापैकी फक्त २ सक्रिय होते. मार्च-एप्रिलमध्ये सर्व ८ सक्रिय होते.

इस्त्रोच्या भुवन प्लॅटफॉर्मवरील डेटावरून असे दिसून येते की मार्च-एप्रिलमध्ये सक्रिय पश्चिमी विक्षोभांमुळे हिमालयातील सिंधू, गंगा आणि ब्रह्मपुत्र नद्यांच्या खोऱ्यात गेल्या तीन वर्षांतील सर्वाधिक बर्फवृष्टी झाली. गेल्या तीन वर्षांपासून हाच प्रकार आहे.

मार्च २०२५ च्या पहिल्या आठवड्यात सिंधू खोऱ्यातील २.०२ लाख चौरस किलोमीटर क्षेत्र, गंगा खोऱ्यातील सुमारे ५३ हजार चौरस किलोमीटर क्षेत्र, ब्रह्मपुत्रा खोऱ्यातील सुमारे एक लाख चौरस किलोमीटर क्षेत्र बर्फाने झाकलेले होते.

**भविष्यात मान्सून उशिरा येणार**

पश्चिमी विक्षोभ तज्ञ प्रा. ए.पी. डिमरी म्हणतात की पश्चिमी विक्षोभ वर्षभर येतात, परंतु हिवाळ्यात त्यांचा मार्ग हिमालयाच्या दक्षिणेकडून राहतो. यामुळे येथे सक्रिय विघ्नांचा परिणाम दिसून येत होता.

त्याच वेळी, उन्हाळ्यात, पश्चिमी विक्षोभ सामान्यतः हिमालयाच्या उत्तरेकडे जात असत आणि त्यांचा कोणताही परिणाम होत नव्हता. आता त्याच्या मागार्ची व्याप्ती वाढली आहे. ते मध्य भारतापर्यंत सक्रिय राहतात आणि अरबी समुद्रातून ओलावा मिळवतात.

पर्वतांपासून मध्य भारतापर्यंत, जोरदार वादळ आणि मेघगर्जनेसह पाऊस पडत आहे. पश्चिमी विक्षोभांच्या कमी हालचालींमुळे, यावर्षी मार्च-एप्रिलमध्ये हिमवृष्टी झाली. यामुळे भविष्यात मान्सूनलाही विलंब होऊ शकतो.

■ ■ ■

# हृदयविकार आणि ब्लू टी?



गोकर्णाचं फुल स्वर्गातून पृथ्वीवर आलं अशी हिंदू धर्मात मान्यता आहे. या फुलांच्या पाकळ्यांपासून बनवलेल्या चहाचे अनेक आरोग्यदायी फायदे आहे. या चहाचे नियमित सेवन केल्याने वजन कमी होण्यास मदत होते. तसेच त्वचेवरील सुरकुत्याही कमी होतात.

याला अपराजिता असेही म्हणतात. वेलीवर लागणारी ही फुलं अत्यंत सुरेख दिसतात तसेच ते औषधी गुणधर्मांने भरपूर आहेत. अनेक कंपन्यांनी याचा व्यवसाय सुरू केला आहे.

तुम्ही कधी गोकर्णाच्या पाकळ्यांपासून तयार केलेला ब्लू टी प्यायला आहात का? जर नसेल तर एकदा घेऊन बघा. गोकर्णाच्या पाकळ्यांपासून तयार केलेला चहा आरोग्यवर्धक आहे. या चहाचे नियमित सेवन केल्याने वजन कमी होण्यास मदत होते. तसेच त्वचा तजेलदार होते.

गोकर्णाच्या फुलांच्या पाकळ्यांपासून तयार केलेल्या चहाच्या सेवनाने शरीरातील चरबी आणि रक्तातील साखरेची पातळी कमी होते. त्वचा आणि केस निरोगी होतात. यामुळे पचनसंस्थाही सुधारते. पचनाची समस्या असलेल्यांनी दररोज दोन कप ब्लू टी प्यायल्यास चांगले परिणाम दिसून येतील.

ब्लू टीमध्ये तणाव कमी करण्याचे गुणधर्म असता. चिंता आणि नैराश्य देखील यामुळे कमी होते. तसेच उल्हासित वाटतं. दिवस एकदम फ्रेश जातो आणि काम करण्यासाठी उत्साह मिळतो. ब्लू टीच्या सेवनामुळे दमा असलेल्यांना आराम मिळतो. शरीरातील उष्णता कमी होते. तसेच मधुमेह टाळता योतो. गोकर्णाच्या फुलांमध्ये औषधी गुणधर्म आहेत. त्यामुळे कोणीही पिऊ शकतं.

ब्लू टी प्यायल्याने कोलेस्ट्रॉल आणि रक्तदाब कमी होतो. हृदयाचे आरोग्य सुधारते. रक्ताच्या गुठल्या होत नाहीत. त्यामुळे हृदयविकार असलेल्यांसाठी हा ब्लू टी आरोग्यवर्धक आहे. या चहामुळे रोगप्रतिकार शक्तिही वाढते.

■ ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### उलट्या बोंबा...!

किती वेळा माफ करावे
यालाही असते मर्यादा
वेळीच ठेचले नाही तर
असुरक्षित राहील देश सर्वदा..

ऋण अग्नी व शत्रूंचे
मागे ठेवू नये अवशेष
निती शास्त्र सांगत
कालांतराने ते करती
आपणास नामशेष...!

दिवसा आमच्या घरात घुसुन
ते करती वारंवार नरसंहार
उलटा चोर कोतवालको डाटे
म्हणे अणुबॉम्बचा
वापर करणार?

# ऑपरेशन सिंदूर



## रॉने दिले 21 टार्गेट्स

७ मे रोजी सकाळी भारतीय हवाई दलाने पाकिस्तान आणि पीओकेमधील ९ दहशतवादी अड्डयांवर हल्ला केला. या कारवाईला 'ऑपरेशन सिंदूर' असे नाव देण्यात आले. २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून हा हल्ला करण्यात आला. पहलगाम हल्ल्यात २५ भारतीय आणि एका नेपाळी नागरिकाचा मृत्यू झाला होता.

पहलगाम हल्ल्यानंतर ११व्या दिवशी, ३ मे रोजी दिल्लीत एक बैठक झाली. साउथ ब्लॉकमध्ये झालेल्या या बैठकीला पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, हवाई दल प्रमुख मार्शल अमरप्रीत सिंह आणि नौदल प्रमुख अ‍ॅडमिरल दिनेश कुमार त्रिपाठी उपस्थित होते. बैठकीत पाकिस्तान आणि पीओकेमधील दहशतवादी तळांवर पुन्हा एकदा हवाई हल्ले करण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्याच दिवशी नियोजनात सहभागी असलेले अधिकारी साउथ ब्लॉकला गेले. हल्ल्याची योजना ५ मे रोजी पंतप्रधान मोदींना दाखवण्यात आली. यासोबतच पहलगाम हल्ल्याचा बदला घेण्यासाठी ऑपरेशन सिंदूरला मान्यता देण्यात आली. अखेर, भारतीय हवाई दलाने ६-७ मे च्या रात्री १:०५ वाजता पाकिस्तान आणि पीओकेवर हवाई हल्ला केला. अवघ्या २५ मिनिटांत चाललेल्या या कारवाईत ७ शहरांमधील ९ दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले.

२४ एप्रिल रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी बिहारमधील मधुबनी येथे होते. पहलगाम हल्ल्याबद्दल ते म्हणाले, 'मी स्पष्ट शब्दात सांगू इच्छितो की या दहशतवाद्यांना आणि या हल्ल्याच्या कट रचणाऱ्यांना त्यांच्या कल्पनेपेक्षा मोठी शिक्षा मिळेल, त्यांना नक्कीच शिक्षा मिळेल. आता दहशतवाद्यांचे उरलेले अड्डे नष्ट करण्याची वेळ आली आहे.

हे काहीतरी मोठे घडणार असल्याचे संकेत होते. २९ एप्रिल रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, एनएसए अजित डोभाल, सीडीएस जनरल अनिल चौहान आणि तिन्ही सशस्त्र दलांच्या प्रमुखांसोबत बैठक घेतली. ३ मे रोजी पुन्हा अशीच आणखी एक बैठक झाली. यामध्ये असे ठरले की पाकिस्तानमध्ये कार्यरत असलेल्या दहशतवादी छावण्या संपवण्यासाठी ठोस पावले उचलणे आवश्यक आहे. यानंतर, तिन्ही सैन्यातील निवडक अधिकाऱ्यांची एक टीम तयार करण्यात आली.

टीमला साउथ ब्लॉकमध्येच क्वारंटाइन करण्यात आले होते. कोणालाही बाहेर जाण्याची किंवा कोणाशीही संपर्क साधण्याची परवानगी नव्हती. त्यांना त्यांचा वैयक्तिक फोन वापरण्याची किंवा त्याच्या कुटुंबाशी बोलण्याचीही परवानगी नव्हती. ५ मे रोजी, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांनी पंतप्रधानांना मंजुरीसाठी ऑपरेशन प्लॅन सादर केला.

७ मे रोजी लष्कराने पत्रकार परिषदेत या कारवाईची माहिती दिली. लष्करातील कर्नल सोफिया कुरेशी आणि हवाई दलातील विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी सांगितले की, ही कारवाई रात्री १:०५ ते १:३०च्या दरम्यान झाली. पाकिस्तान आणि पीओकेमध्ये ९ टार्गेट निवडली गेली. ती नष्ट झाली. दहशतवाद्यांचे लाँचिंग पॅड आणि प्रशिक्षण केंद्रे लक्ष्य करण्यात आली.

भारतीय हवाई दलाने १०० किलोमीटर अंतरावर २४ क्षेपणास्त्रांनी एकूण ९ टार्गेट्स उद्ध्वस्त केली. यामध्ये काही मशिदीदेखील होत्या, ज्या दहशतवाद्यांसाठी बेस कॅम्प म्हणून वापरल्या जात होत्या. हल्ल्यात लष्कर आणि नौदलाचीही मदत घेण्यात आली. या कारवाईत क्षेपणास्त्रे आणि ड्रोनचा वापर करण्यात आला.

पंतप्रधान मोदी रात्रभर ऑपरेशनवर लक्ष ठेवून होते. एनएसए अजित डोवाल यांनी तिन्ही सैन्यांमध्ये समन्वय निर्माण केला. त्याला दहशतवादी छावण्या ओळखण्याची जबाबदारी देण्यात आली होती.

हल्ल्यासाठी भारताची गुप्तचर संस्था रॉ आणि राष्ट्रीय तांत्रिक संशोधन संघटनेने २१ दहशतवादी लपण्याच्या ठिकाणांची माहिती दिली होती. यापैकी, ९ सर्वात महत्त्वाची लक्ष्ये निवडण्यात आली.

एनएसए अजित डोवाल यांनी तिन्ही सैन्यातील निवडक अधिकाऱ्यांची एक टीम तयार केली. या कारवाईचा उद्देश जैश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तैयबा या दहशतवादी संघटनांच्या वरिष्ठ नेतृत्वाला लक्ष्य करणे आहे, अशी माहिती त्यांना देण्यात आली.

हवाई दलाने लक्ष्य केलेल्या ९ दहशतवादी अड्ड्यांपैकी ४ पाकिस्तानात आणि ५ पाकव्याप्त काश्मीरमध्ये होते. यामध्ये बहावलपूरमधील जैश-ए-मोहम्मदचे मुख्यालय, कोटलीमधील दहशतवादी प्रशिक्षण शिबिर, मुझफ्फराबादमधील लष्कर-ए-तैयबाचे लपण्याचे ठिकाण, मुरीदकेमधील लष्कराचे मुख्यालय आणि बागमधील हिजबुल मुजाहिदीनचा तळ यांचा समावेश आहे. या कारवाईदरम्यान पाकिस्तानी सैन्याला लक्ष्य करण्यात आले नसल्याचे लष्कराने स्पष्ट केले. या कारवाईचा उद्देश केवळ लष्करी कारवाई नव्हता. हे जगाला संदेश देण्यासाठी होते की भारत आता दहशतवादावर फक्त वक्तव्य करणार नाही. अचूक आणि प्रभावी लष्करी कारवाईने प्रत्युत्तर देऊ.

पत्रकार परिषदेत परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री म्हणाले की, पहलगाममधील हल्ल्यामुळे देशात संताप आहे. २२ एप्रिल रोजी झालेल्या हल्ल्यातील गुन्हेगारांना आणि कट रचणाऱ्यांना शिक्षा होणे आवश्यक होते. पाकिस्तान नकार आणि आरोप करण्यात व्यस्त राहिला.

पाकिस्तानमधील दहशतवादी तळांवरून अधिक हल्ले झाल्याचे वृत्त आहे. त्यांना थांबवणे आवश्यक होते. आम्ही आमचा अधिकार बजावला आहे. ही कृती मोजमाप केलेली आणि जबाबदार आहे. त्याचे लक्ष दहशतवादाची पायाभूत सुविधा उद्ध्वस्त करणे आणि दहशतवाद्यांना अक्षम करणे यावर आहे.

परराष्ट्र सचिव पुढे म्हणाले, '२२ एप्रिल रोजी लष्कर-ए-तोयबाच्या आणि पाकिस्तानमध्ये प्रशिक्षित पाकिस्तानी दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये भारतीय पर्यटकांवर हल्ला केला. २५ भारतीय आणि एका नेपाळी नागरिकाचा मृत्यू झाला. २६/११ च्या मुंबई हल्ल्यानंतर नागरिकांवर झालेला हा सर्वात मोठा हल्ला होता.

'लोकांना त्यांच्या कुटुंबीयांसमोर मारण्यात आले.' त्यांना या हल्ल्याचा संदेश पसरवण्यास सांगण्यात आले. जम्मू आणि काश्मीरमधील चांगले वातावरण बिघडवणे हा त्याचा उद्देश होता. गेल्या वर्षी २.२५ कोटींहून अधिक पर्यटक काश्मीरमध्ये आले होते. हल्ल्याचा उद्देश येथील प्रगतीला हानी पोहोचवणे होता.

हल्ल्याची पद्धत जम्मू आणि काश्मीर आणि देशात जातीय दंगली पसरवण्यापासून प्रेरित होती. टीआरएफ नावाच्या एका गटाने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली. या गटावर संयुक्त राष्ट्रांनी बंदी घातली आहे. ते लष्कर-ए-तैयबाशी जोडलेले आहे.

पाकिस्तानच्या दहशतवादी संघटनांसाठी टीआरएफचा वापर कव्हर म्हणून केला जात होता. लष्करसारख्या संघटना टीआरएफ वापरत आहेत. पहलगाम हल्ल्याच्या तपासात पाकिस्तान आणि दहशतवाद्यांमधील संबंध उघड झाले आहेत.

टीआरएफचे दावे आणि लष्करशी जोडलेल्या सोशल मीडिया पोस्ट हे सिद्ध करतात. हल्लेखोरांची ओळख पटली आहे. हा हल्ला पाकिस्तानच्या सीमापार दहशतवाद पसरवण्याच्या योजनेचा एक भाग होता. पाकिस्तान आता दहशतवाद्यांसाठी सुरक्षित आश्रयस्थान म्हणून ओळखले जात आहे.

त्यांच्यासोबत पत्रकार परिषदेत उपस्थित असलेल्या कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी सांगितले की, पाकव्याप्त काश्मीरमधील मुझफ्फराबादमधील सवाई नाला येथे लश्कर ए तय्यबाचे प्रशिक्षण केंद्र आहे. सोनमर्ग, गुलमर्ग आणि पहलगाम हल्ल्यातील दहशतवाद्यांनी येथे प्रशिक्षण घेतले होते. सय्यदना बिलाल कॅम्पमध्ये शस्त्रे आणि जंगलात जगण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.

कोटली गुरपूर कॅम्प लश्करचा आहे. २०२३ मध्ये पूंछमध्ये यात्रेकरूंवर हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांना येथे प्रशिक्षण देण्यात आले होते.

बर्नाला कॅम्प भिंबर येथे शस्त्र हाताळणीचे प्रशिक्षण दिले जात असे. अब्बास कॅम्प कोटली हे नियंत्रण रेषेपासून १३ किमी अंतरावर आहे. येथे आत्मघातकी हल्लेखोर तयार केले जातात.

**मसूद अझहरच्या कुटुंबातील १० जणांचा मृत्यू**

या हवाई हल्ल्यात १०० हून अधिक दहशतवादी मारले गेले आहेत. त्यात लष्कर-ए-तैयबाचा हाफिज अब्दुल मलिकचाही समावेश आहे. मुरीदके येथील मरकज तैयबा येथे झालेल्या हवाई हल्ल्यात मलिक मारला गेला. हाफिज अब्दुल मलिक हा संघटनेचा एक महत्त्वाचा चेहरा मानला जात होता.

बीबीसी उर्दूच्या वृत्तानुसार, सुभान अल्लाह मशिदीवरील हल्ल्यात त्याच्या कुटुंबातील १० सदस्य आणि चार जवळचे सहकारी मारले गेले आहेत, असे जैश-ए-मोहम्मदचा प्रमुख मौलाना मसूद अझहरने म्हटले आहे. मसूद अझहरच्या बहिणीचा पतीही मारल्या गेलेल्यांमध्ये आहे. याशिवाय त्यांचे मोठे नुकसान झाले आहे.





# मुंबई हल्ल्यापासून पहलगामपर्यंतच्या ७ हल्ल्यांचा एकाच वेळी बदला



भारताच्या ऑपरेशन सिंदूरमध्ये, जैश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तैयबाच्या त्या तळांना लक्ष्य करण्यात आले, जे भारतात हल्ल्यांचे कट रचत होते आणि दहशतवाद्यांसाठी प्रशिक्षण केंद्रे होती. यापैकी ५ छावण्या पाकव्याप्त काश्मीर (पीओके) आणि ४ पाकिस्तानच्या पंजाब प्रांतात होत्या. भारतान २४ क्षेपणास्त्रांनी हल्ला केला.

**भारताने या ९ क्षेत्रांनाच का लक्ष्य केले?**

**१. बहावलपूरः जैश-ए-मोहम्मदचे मुख्यालय**

पाकिस्तानातील १२ व्या क्रमांकाचे सर्वात मोठे शहर जैश-ए-मोहम्मदचे घर आहे. लाहोरपासून सुमारे ४०० किमी. बहावलपूरमध्ये पुढे जामिया मस्जिद सुभान अल्लाह कॉम्प्लेक्स आहे, जिथे जैशचे मुख्यालय आहे.

याला उस्मान-ओ-अली कॉम्प्लेक्स असेही म्हणतात. हे क्षेत्र आंतरराष्ट्रीय सीमेपासून सुमारे १०० किमी अंतरावर आहे. ते खूप दूर आहे. जैश-ए-मोहम्मदचे संस्थापक मौलाना मसूद अझहर यांचा जन्म बहावलपूरमध्ये झाला होता आणि तो येथे कडक सुरक्षेत राहतो.

**२. मुरीदकेः लष्कर-ए-तैयबाचे मुख्यालय**

लाहोरपासून सुमारे ३३ किमी. लष्कर-ए-तैयबाचे मुख्यालय हे ग्रँड ट्रंक रोडवर आहे. पाकिस्तान आणि काश्मीरमधून हजारो सैनिकांना येथे प्रशिक्षण आणि दहशतवादी कारवायांचे नियोजन करण्यासाठी आणले जाते. हे कॅम्पस २०० एकरवर पसरलेले आहे. २६/११ च्या मुंबई हल्ल्यातील दहशतवादी येथूनच आले होते.

**३. गुलपूरः पूंछ आणि यात्रेकरूंवर हल्ला नियोजित होता**

नियंत्रण रेषेजवळ पूंछ-राजौरीपासून ३५ किमी. ते खूप दूर स्थित आहे. २० एप्रिल २०२३ रोजी पूंछ येथे झालेला हल्ला आणि २४ जून २०२४ रोजी यात्रेकरूंच्या बसवर झालेला हल्ला येथूनच रचण्यात आला होता.

हा परिसर लष्कर-ए-तैयबा आणि जैश-ए-मोहम्मद सारख्या संघटनांशी संबंधित दहशतवाद्यांना आश्रय देतो. पाकिस्तानच्या विविध भागांमध्ये आणि नियंत्रण रेषेत दहशतवाद्यांच्या हालचालींसाठी हा ऐतिहासिक दृष्ट्या एक महत्त्वाचा मार्ग असल्याने, गुप्तचर संस्थांच्या नजरेत ते नेहमीच राहिले आहे.

**४. मुझफ्फराबादः जैशचे लाँचपॅड**

नियंत्रण रेषेपासून सुमारे ५३ किमी अंतरावर असलेल्या जैशच्या सय्यदना बिलाल कॅम्पला लक्ष्य करण्यात आले. ते खूप दूर आहे. जैशचे लाँचपॅड येथेच आहे.

याशिवाय, काश्मीर पाकिस्तानात विलीन करण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या हिजबुल मुजाहिदीनचे मुख्यालय मुझफ्फराबाद येथे आहे. हे क्षेत्र दहशतवादाच्या प्रमुख ठिकाणांपैकी एक मानले जाते. जे जिहादसाठी दहशतवाद्यांना तयार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते.

हवाई हल्ल्यादरम्यान, भारताने पाकव्याप्त काश्मीरमधील मुझफ्फराबाद येथे असलेल्या दहशतवाद्यांच्या अड्डयांवर हल्ला केला.

**५. कोटलीः लष्कर कॅम्प**

राजौरीजवळ नियंत्रण रेषेपासून १५ किमी अंतरावर लष्कर-ए-तैयबा कॅम्प. येथे सुमारे ५० दहशतवादी होते. नियंत्रण रेषेच्या जवळ असल्याने, दहशतवादी कोटली मार्गे भारतात सहजपणे प्रवेश करू शकत होते. भारतीय लष्कराने दावा केला की कोटली कॅम्प पहलगाम हल्ल्यासाठी लॉजिस्टिक आणि प्रशिक्षण केंद्र म्हणून काम करत होता.

**६. सियालकोटः जैशचा मुख्य झोन**

हे जैश आणि लष्करचे मुख्य क्षेत्र आहे आणि पंजाब प्रांतातील एक शहर आहे. त्याची सीमा भारतातील गुजरात, जम्मू, नारोवाल आणि गुजरांवाला या शहरात आहे. ते लाहोरपासून सुमारे १२५ किमी अंतरावर आहे. ते खूप दूर आहे. येथून जैश आणि लष्करचे दहशतवादी जम्मूमध्ये घुसखोरी करायचे. भारताने हिजबुल मुजाहिदीनच्या महमूना झोया तळावर हल्ला केला.

**७. बिंभरः दहशतवाद्यांचा बालेकिल्ला**

इलियास काश्मिरी याचा जन्म येथेच झाला, तो पाकिस्तान स्पेशल फोर्सेसचा माजी सैनिक होता आणि नंतर तो दहशतवादी नेता बनला. त्याने हरकत-उल-जिहाद अल-इस्लामीमध्ये ३१३ ब्रिगेडची स्थापना केली आणि अल-कायदामध्ये सामील झाला. २०११ मध्ये अमेरिकेच्या ड्रोन हल्ल्यात मारला गेला. त्यानंतर भिंबर दहशतवाद्यांचा बालेकिल्ला बनला. याशिवाय चक अमरू आणि बाग येथेही हवाई हल्ले करण्यात आले, तेथे दहशतवादी लपल्याचीही माहिती आहे.

**तिन्ही सैन्यांनी संयुक्त ऑपरेशन म्हणून 'ऑपरेशन सिंदूर' राबवले**

सूत्रांनी एएनआय वृत्तसंस्थेला सांगितले की, ही एक संयुक्त लष्करी कारवाई होती ज्यामध्ये भारतीय लष्कर आणि हवाई दलाने संयुक्तपणे अचूक स्ट्राइक शस्त्रांचा वापर केला. याची तयारी काही दिवस आधीच सुरू झाली. या ९ ठिकाणी दहशतवाद्यांच्या उपस्थितीची माहिती गुप्तचर यंत्रणेने गोळा केली. यानंतर, येथे क्षेपणास्त्राने हल्ला करण्याची योजना आखण्यात आली.

वृत्तसंस्था एएनआयने सूत्रांच्या हवाल्याने सांगितले की, भारतीय लष्कराने पहलगाम दहशतवादी हल्ल्यासाठी जैश-ए-मोहम्मद आणि लष्करच्या अड्डयांवर हल्ला करण्याच्या उद्देशाने लक्ष्य निवडले होते. भारतीय लष्कराने म्हटले आहे की, पाकिस्तानी लष्करी ठिकाणांना लक्ष्य करण्यात आले नाही. दहशतवाद्यांच्या अड्ड्याला लक्ष्य करण्यात आले आहे.

आतंकवाद्यांचे कंबरडे मोडणारा हा हल्ला असून, या हल्ल्याचे भारतीयांनी स्वागत केले आहे. भारतात सर्वत्र जल्लोषाचे वातावरण आहे.

# सैन्याचे कौतुक

भारतीय हवाई दलाने मंगळवारी रात्री १:०५ वाजता पाकिस्तान आणि पीओकेमध्ये ९ ठिकाणी हवाई हल्ले केले. या हल्ल्यात १०० हून अधिक दहशतवादी मारले गेले आहेत. पहलगाम येथे झालेल्या अतिरेकी हल्ल्याच्या १५ दिवसांनंतर भारताने ही कारवाई केली.

या ऑपरेशनच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना फोन करून अभिनंदन केले. ऑपरेशन सिंदूर पार पडल्यानंतर शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सरक्षमंत्र्यांना फोन करून या कारवाईचे कौतुक केले. याबाबत शरद पवार यांनी स्वतः सोशल मीडियावर पोस्ट करून माहिती दिली.

ऑपरेशन 'सिंदूर'च्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान आणि संरक्षणमंत्री यांच्याशी संवाद साधला. भारतीय सशस्त्र दलांच्या प्रयत्नांचे कौतुक केले आणि त्यांनी केलेल्या कारवाईसाठी त्यांचे अभिनंदनही केले. या कठीण काळात सरकारला आमचा पूर्ण पाठिंबा असल्याची ग्वाही दिली. अशी पोस्ट शरद पवार यांनी केली आहे.

दरम्यान, महिलांना सैन्यदलात संधी मिळवून देणाऱ्या धोरणी निर्यणामुळेच ऑपरेशन सिंदूर मध्ये कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग यांच्या शौर्याची जगाला प्रचिती आली, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने म्हटले आहे. शरद पवार सरंक्षण मंत्री असताना हा निर्णय घेण्यात आला होता. यासंदर्भात पक्षाच्या वतीने सोशल मीडियावर पोस्ट करण्यात आली आहे.

एक दूरदृष्टीचा निर्णय, जो आज इतिहास घडवतोय... भारताचे संरक्षण मंत्री असताना, माननीय शरदचंद्र पवार साहेबांनी एक धाडसी निर्णय घेतला..'महिलांना भारतीय संरक्षण दलात स्थान द्यायचे!' सुरुवातीला तिन्ही दलांचे प्रमुख याला तयार नव्हते. पण पवार साहेबांची दूरदृष्टी, निर्णयक्षमता आणि महिला सक्षमीकरणाबद्दलची असामान्य बांधिलकी यामुळे त्यांनी १८% आरक्षणाचा ऐतिहासिक निर्णय घेतला.

आज पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा बदला घेताना, कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग यांच्यासारख्या महिला अधिकाऱ्यांनी देशाचे नेतृत्व करत भारतीय सैन्याचं शौर्य जगाला दाखवून दिले. ही फक्त संधी नव्हती, ही शक्तीची ओळख होती! हा निर्णय नव्हे, क्रांती होती.....




**भारत यापेक्षा जास्त काही करण्यास सक्षम...**



मी भारतीय सैन्य आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींना सलाम करतो. हा भारताचा सूड आहे... बालाकोटमध्ये संदेश मिळाल्यानंतरही, पाकिस्तानला हे समजले नाही की भारत यापेक्षा जास्त काही करण्यास सक्षम आहे. काल रात्री ऑपरेशन सिंदूरने त्यांना हे दाखवून दिले... त्यांच्या विपरीत, आम्ही निष्पाप नागरिकांना लक्ष्य केले नाही तर दहशतवादाचे केंद्र आणि सूत्रधारांना लक्ष्य केले... जगाने पाकिस्तानवर दबाव आणण्याची वेळ आली आहे. किमान भारतीय भूमीवरून तरी दहशतवादाचा कायमचा धोका संपवावा.

■ **प्रफुल्ल पटेल**

मला भारतीय सैन्याचा खूप अभिमान आहे, त्यांनी असाधारणपणे कारवाई केली आहे. मी भारत सरकारच्या विधानाचे कौतुक करते. त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे की, ही एक लक्ष्यीत कारवाई आहे आणि मी त्याचा आदर करते. कारण ही लढाई कोणत्याही देशाविरुद्ध किंवा कोणत्याही नागरिकांविरुद्ध नाही, तर ती दहशतवादाविरुद्ध आहे.

■ **सुप्रिया सुळे**



ही लढाई भारतीय सेनेची आणि भारतीय फौजांची आहे. त्यामुळे यामध्ये कोणीही श्रेयवादाची लढाई करण्याचे कारण नाही. पाकिस्तानचा कसा बदला घ्यावा, याची जबाबदारी ही भारतीय सैन्यावर सोडवण्यात आली होती. त्यामुळे रात्री कोण मॉनिटरिंग करत होते, या बद्दल न बोललेलेच बरे. भारतीय सेना कोणतेही कारवाई करताना उथळपणा किंवा घाई करत नाही. भारतीय सेना ही संयमी आणि अभ्यासू सेना आहे. योग्य वेळी योग्य पाऊल टाकण्यासाठी भारतीय सेना प्रसिद्ध आहे. जगातील नामवंत सैन्यांमध्ये भारतीय सैनिकांची गणना होते. हा हल्ला त्याचेच उदाहरण आहे. त्यामुळे याचे श्रेय घेण्याचा कोणी प्रयत्न करत असेल तर तो २६ भारतीय नागरिकांच्या टाळू वरील लोणी खाण्याचा प्रयत्न करत आहे.

■ **खा. संजय राऊत**



भारतीय सैन्य दालाला माझा सलाम!! पंधरा दिवसापूर्वी काश्मिरात जे निष्पाप २७ जण दहशतवादी हल्ल्यात मारले गेले, त्यामुळे जनतेत अस्वस्थता होती. आज भारतीय सैन दलाने राबविलेल्या ऑपरेशन मध्ये पाकिस्तानातील ९ दहशतवादी केंद्र उद्धवस्त केली. भारतीय सैनाचा मला अभिमान आहे. देशाच्या सुरक्षेशी कोणत्याही प्रकारे कोणी छेडखानी करत असेल तर, ती सहन केली जाणार नाही. भारत माता की जय!

■ **एकनाथ खडसे**



दहशतवादाचा बंदोबस्त करण्यासाठी ऑपरेशन सिंदूर हे भारतीय सैन्याचे एक अतुलनीय पाऊल आहे. ही कामगिरी संपूर्ण देशासाठी अभिमानास्पद आहे. पाकपुरस्कृत दहशतवाद्यांच्या भ्याड हल्ल्याचा बदला भारताने घेतला आहे. आता पाकिस्तान पुन्हा भारताकडे वाकड्या नजरेने पाहायची हिंमत करणार नाही. सिंदूरसारखी कारवाई पुन्हा पुन्हा करून पाकिस्तानला धडा शिकवावा लागेल. भारतीय सैन्याच्या शौर्याला आणि मोदींच्या खंबीर नेतृत्वाला सलाम.

■ **रामदास आठवले, केंद्रीय मंत्री**

# आईच्या सांगण्यावरून भावाचा गोळ्या झाडून खून

■ **महासागर प्रतिनिधी, सावनेर, दि. ७ :** अगदी क्षुल्लक कारणावरुन आईने लहान मुलाला मोठ्या मुलावर गोळीबार करुन खून करण्यासाठी प्रोत्साहन दिले. मुलानेही रागाच्या भरात प्राण्यांना मारण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या भरमार बंदुकीतून मोठ्या भावावर गोळ्या झाडून खून केला.

ही घटना बुधवारी सकाळी अकरा वाजता सावनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील धापेवाड्यात घडली. इंद्रजीतसिंह छगनसिंह भोंडे (३२, धापेवाडा) असे मृत युवकाचे नाव आहे. सावनेर पोलिसांनी आरोपी आई बिशन कौर भोंडे (५५) आणि मुलगा जगजीतसिंह भोंडे (३०) यांना अटक केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, इंद्रजीतसिंह हा लाकडी पोळीपाट बनवून विक्री करीत होता. तो पत्नी व दोन मुलांसह आईवडिलापासून वेगळा राहत होता. त्याचा भाऊ जगजीतसिंह हा दारुडा आहे. त्याच्या दारुच्या व्यसनामुळे तीन वर्षांपूर्वी पत्नी दोन मुलांसह माहेरी निघून गेली. तेव्हापासून अट्टल दारुडा झाला होता.





तो नेहमी मोठा भाऊ इंद्रजीतसिंह व वहिणीला दारु पिण्यासाठी पैसे मागायचा. पैसे न दिल्यास वाद घालून भांडण करायचा. त्याच्या नेहमीच्या त्रासाला इंद्रजीतसिंह कंटाळला होता. बुधवारी सकाळी जगजीतसिंहने मोठ्या भावाला दारुसाठी पैसै मागितले. मात्र, इंद्रजीतने पैसे देण्यास नकार दिला आणि जेवण करण्यासाठी बसला.

पैसे न दिल्यामुळे चिडलेल्या जगजीतसिंहने घरातून भरमार बंदूक काढली. त्यामध्ये छर्रे भरले आणि भावाच्या दिशेने ताणली. दरम्यान, आई बिशन कौर हिनेही जगजीतला गोळ्या झाडून खून करण्यासाठी प्रोत्साहन दिले.

त्यामुळे जगजीतने लगेच भावाच्या छातीला बंदूक लावून गोळीबार केला. या हल्ल्यात इंद्रजीत रक्ताच्या थारोळ्यात पडला. बंदुकीचा आवाज आल्यामुळे शेजाऱ्यांनी धाव घेतली. काही वेळातच अतिरिक्त पोलीस अधीक्षक अनिल म्हस्के हे घटनास्थळावर पोहचले.

त्यांनी आरोपीला ताब्यात घेतले. या प्रकरणी सावनेर पोलिसांनी गुन्हा दाखल करुन आरोपी बिशन कौर आणि जगजीतसिंहला अटक केली.

इंद्रजीतसिंह हा पत्नीसह जेवण करीत होता. दिर जगजीतच्या हातात बंदूक बघून वहिणीने त्याला रोखण्याचा प्रयत्न केला. तसेच पतीलाही सतर्क केले. यादरम्यान, जगजीतने गोळीबार केला. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या इंद्रजीतला पत्नीने मांडीवर घेतले. त्याला पाणी पाजले. मात्र, आठ ते दहा छर्रे छातीतून घुसल्यामुळे त्याचा पत्नीच्या मांडीवरच जीव गेला.

## सोन्याचे बिस्किट चोरणाऱ्या टोळीचा छडा

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :** सराफाच्या दुकानात नोकरी बनून सोन्याचा बिस्किट चोरणाऱ्या टोळीचा तहसिल पोलिसांनी भंडाफोड केला. दोन आरोपींना अटक करून त्याच्याकडून ५५ ग्रॅम सोन्याचे बिस्किट जप्त करण्यात आले आहेत.

वैभव मालगावे (रा. ईचलकरंजी) आणि जगन्नाथ जावीर (रा. खंबाळे, सांगली) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. या टोळीतील दोन म्होरके फरार असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत. या टोळीने दिल्लीतही अशाच प्रकारची चोरी केली.

जुनी शुक्रवारी येथील रहिवासी सदाशिव सूर्यवंशी (५५) यांचे इतवारी मार्गावर सूर्यवंशी रिफायनरी नावाने दुकान आहे. त्यांच्याकडे सोन्याचे बिस्किट तयार केले जातात. आरोपी वैभवने मार्च महिण्याच्या शेवटच्या आठवड्यात फिर्यादीला फोन केला. तुमच्या गावचा रहिवासी आहे. मला कामाची आवश्यकता आहे. बिस्किट बनविण्याचे काम मला येते, असे सांगून त्यांना विश्वासात घेतले.

गावचा युवक असल्याने त्यांनी युवकाला प्रत्यक्षात भेटण्यास सांगितले. त्याने सूर्यवंशी यांची प्रत्यक्षात भेट घेतली. त्यांनी त्या युवकाला कामावर ठेवले. तो त्यांच्या घरीच राहायचा.

घटनेच्या दिवशी फिर्यादी कामानिमीत्त बाहेर होते. त्यावेळी त्यांचा मुलगा दुकानात होता. दरम्यान तो लघुशंकेला गेला. हीच संधी पाहून आरोपीने ड्राव्हरमधून सोन्याचे बिस्किट चोरले आणि पळाला. विशेष म्हणजे ड्राव्हरला चावी लागलीच होती.

फिर्यादीचा मुलगा दुकानात आला असता नोकर दिसला नाही तसेच सोन्याचे बिस्किटही दिसले नाही. त्याने फियार्दीला माहिती दिली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक शुभांगी देशमुख यांनी गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले. फिर्यादीकडे युवकाचा फोटो सुध्दा नव्हता. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजवरून आरोपीचे छायाचित्र घेतले. वैभव आणि जगन्नाथ या दोघांना अटक करून त्यांना नागपुरात आणले. सखोल चौकशीत दिल्ली येथील सराफाच्या दुकानात नोकर बनून त्यांनी चोरी केल्याचे निष्पन्न झाले.

## पाच माजी नगरसेवकांनी पक्षप्रवेश नाकारला

**शिंदे सेनेचा दावा खोटा**

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ७ :** नागपुरात शिंदे सेनेला मोठा धक्का बसला आहे. उद्धव ठाकरे सेना, भाजप, काँग्रेस आणि बसपाच्या दहा माजी नगरसेवकांनी पक्षात प्रवेश केल्याचा दावा करणाऱ्या शिंदे सेनेची पोलखोल झाली आहे. दहापैकी पाच नगरसेवकांनी आपण पक्षात प्रवेश केला नसल्याचे स्पष्ट केले.

परसराम बोकडे, भास्कर बुरडे, भीमराव नंदनवार, जिजा धकाते आणि भाजपच्या माजी नगरसेविका दुर्गा रेहपाडे या पाच जणांनी शिंदे सेनेत प्रवेश केला नसल्याचे जाहीर केले. त्यांनी सांगितले की वर्तमानपत्रातील बातम्यांमधूनच त्यांना आपल्या तथाकथित पक्षप्रवेशाची माहिती मिळाली. त्यांच्याशी कोणतीही चर्चा किंवा विचारणा करण्यात आली नव्हती.

राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात या नगरसेवकांच्या प्रवेशाचा दावा करण्यात आला होता. दुसरीकडे संपर्क प्रमुख आणि पूर्व विदर्भाचे संघटक यांना बोलावण्यात आले नव्हते, यामुळे शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये नाराजी आहे.

## महावितरणच्या संचालक (प्रकल्प) पदी
# सचिन तालेवार रूजू

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई दि. ७ :** महावितरण कंपनीचे संचालक (प्रकल्प) म्हणून सचिन तालेवार यांनी बुधवारी कार्यभार स्वीकारला. त्यांची या पदावर थेट भरती प्रक्रियेतून निवड झाली आहे. याआधी ते इंदूर येथील मध्यप्रदेश पश्चिम क्षेत्र विद्युत वितरण कंपनीचे संचालक (तांत्रिक) म्हणून कार्यरत होते. तालेवार गेल्या २८ वर्षांपासून महावितरणमध्ये विविध पदांवर कार्यरत आहेत.



नवनियुक्त संचालक (प्रकल्प) सचिन तालेवार मूळचे नागपूर जिल्ह्याचे असून त्यांचे शालेय शिक्षण छिंदवाडा (मध्यप्रदेश) येथे झाले आहे. विद्युत अभियांत्रिकी पदवी संपादन केल्यानंतर तालेवार १९९७ मध्ये तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामध्ये कनिष्ठ अभियंता म्हणून चंद्रपूर येथे रूजू झाले. पदोन्नतीने सहायक अभियंता म्हणून कार्यरत असताना सन २००६ मध्ये सरळ सेवा भरतीद्वारे त्यांची कार्यकारी अभियंता म्हणून निवड झाली.

या पदावर त्यांनी वर्धा, नागपूर व जालना येथे काम केले आहे. दरम्यान महावितरणकडून त्यांची गूडगाव येथील मॅनेजमेंट डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूटमधील (एमडीआय) एनर्जी मॅनेजमेंटच्या पोस्ट ग्रॅज्यूएशन डिप्लोमा इन बिझीनेस मॅनेजमेंट (पीजीडीएम) अभ्यासक्रमासाठी निवड झाली होती. सन २००७-०८ मध्ये हा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे.

त्यानंतर सन २०१६ मध्ये झालेल्या सरळसेवा भरतीमध्ये सचिन तालेवार यांची अधीक्षक अभियंता म्हणून निवड झाली. या पदावर लातूर येथे काम केले. तर २०१८ मध्ये सरळसेवा भरतीद्वारे त्यांची मुख्य अभियंता म्हणून निवड झाली. पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून त्यांनी जून २०१८ ते डिसेंबर २०२२ पर्यंत काम केले.

बदलीद्वारे छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत असताना मे २०२३ मध्ये तालेवार यांची इंदूर येथील मध्यप्रदेश पश्चिम क्षेत्र विद्युत वितरण कंपनीचे संचालक (तांत्रिक) म्हणून निवड झाली. या कंपनीत ते दोन वर्षांपासून कार्यरत होते. त्यानंतर महावितरणचे संचालक (प्रकल्प) म्हणून नुकत्याच झालेल्या थेट भरती प्रक्रियेत त्यांची निवड झाली आहे.

महावितरणच्या ग्राहकांना दर्जेदार वीजपुरवठा करण्यासाठी सुधारित वितरण क्षेत्र योजनेसह विविध योजनांमधून पायाभूत वीजयंत्रणेच्या विस्तारीकरण व सक्षमीकरणाची कामे सुरू आहेत. या कामांसोबतच प्रामुख्याने सौर ऊर्जा प्रकल्पांच्या सर्व योजनांना आणखी गती देत कामे लवकर पूर्ण करण्यात येईल, असे सचिन तालेवार यांनी सांगितले.

## क्यूआर कोड स्कॅन करून होणार रुग्णांची नोंदणी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :** राज्यातील सगळ्याच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांत रुग्णांना बाह्यरुग्ण विभागाचे कार्ड काढण्यासाठी तास-दोन तास रांगेत उभे राहावे लागायचे. आता रुग्णांची नोंदणी क्यूआर कोड स्कॅन करून होणार आहे.

महाराष्ट्रासह देशभरातील नागरिकांसाठी आयुष्मान भारत हेल्थ अकाऊंट नंबर कार्ड (आभा) नोंदणीची प्रक्रिया सुरू आहे. हे कार्ड असलेल्यांसाठी वैद्यकीय शिक्षण खात्याकडून सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतील रुग्णालयांत क्यूआर कोड नोंदणीचा पथदर्शी प्रकल्प सुरू करण्यात आला आहे.

हे कार्ड असलेल्यांना बाह्यरुग्ण विभागातील नोंदणी कक्षात जावे लागेल. येथे बारकोड स्कॅन करताच संबंधित रुग्णाबाबतची सगळी माहिती स्वयंचलित पद्धतीने संकेतस्थळावर येईल.

त्यामुळे रुग्णाच्या नोंदणीसाठीचा वेळ वाचेल. येत्या काळात रुग्ण स्वतः स्कॅन करून ऑनलाईन पैसेही भरू शकतील. त्यामुळे रांगेत लागण्याची गरज भासणार नाही. नागपुरातील मेडिकलमध्येही हा प्रकल्प सुरू झाला आहे. त्यासाठीचे स्कॅनर वैद्यकीय शिक्षण खात्याकडून उपलब्ध करण्यात आले आहे.

मेडिकल रुग्णालयात या प्रकल्पावर काम सुरू झाले आहे. त्यामुळे येत्या काळात रुग्णांना रांगेत उभे रहावे लागणार नाही. त्यासाठी अधिष्ठाता डॉ. राज गजभिये विशेष लक्ष देत आहेत, अशी माहिती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे (मेडिकल) वैद्यकीय अधीक्षक डॉ. अविनाश गावंडे यांनी दिली.

## एचएसआरपी नंबर प्लेटसाठी अवैध वसुली

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :** जुन्या वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणीक्रमांकाची पाटी लावणे बंधनकारक आहे. त्यासाठी शासनाने जीएसटी वगळून दुचाकीसाठी ४५० रुपये निश्चित केले असतांनाच काही केंद्र चालक अवास्तव शुल्क घेऊन नागरिकांची लुट करत आहे. ग्राहकांच्या तक्रारीवरून शासनाने नागपुरातील एका केंद्राचे काम थांबवले आहे.

शासनाने १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांकाची पाटी ३० जून २०२५ पर्यंत बसवणे बंधनकारक केले आहे. त्याबाबत राज्याच्या परिवहन विभागाने सर्व आरटीओ कार्यालयांना निर्देश दिले आहेत.

यासाठी दुचाकी, चारचाकी, मालवाहू वाहनांसह सर्व संवगार्तील वाहननिहाय जीएसटीसह शासनाने दर निश्चित करुन दिले असून या नंबरप्लेट बसविण्यासाठी ठरावीक संस्थांची निवड केली आहे.

नागपुरातील झेन टीव्हीएस मोबीलीटी व्हेंचर प्रायव्हेट लिमिटेड या सेंटरने ठरवून दिलेल्या दरापेक्षा अतिरिक्त दर घेतल्याच्या तक्रारी नागपुरातील प्रादेशिक परिवहन कार्यालयांकडे ग्राहकांकडून मिळाल्या होत्या.

त्यावरून आरटीओ कार्यालयाकडून सदर सेंटरला नोटीस बजावण्यात आली असून सदर फिटमेंट सेंटरचे काम बंद करण्यात आले आहे.

एचएसआरपी ही एक उच्च-सुरक्षा नोंदणी प्लेट आहे जी रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने सेट केलेल्या वैशिष्ट्यांचे पालन करते. एचएसआरपी प्लेटला एक अद्वितीय नोंदणी क्रमांक आहे आणि ती छेडछाड-पुरावा, चोरी-प्रतिरोधक आणि टिकाऊ म्हणून डिझाइन केलेली आहे. मात्र, या नंबर प्लेटसाठी ठरवून दिल्यापेक्षा अधिक शुल्क घेवून लुबाडणूक सुरू आहे.

## 'स्लीपर्स सेल' उद्ध्वस्त करा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई दि. ७ :** उद्धव ठाकरे यांनी भारतीय सेनेच्या शौर्याला सलाम अशा शब्दांत भारतीय सैन्याने केलेल्या कारवाईचे कौतुक केले. पाकिस्तानचे भारतातील स्लीपर्स सेल्स उद्ध्वस्त करण्याची मागणी त्यांनी सरकारकडे केली आहे.



उद्धव ठाकरे म्हणाले, भारतीय सैन्याने पाकड्यांच्या दहशतवादी स्थळांवर केलेला हल्ला अभिमानास्पद आहे. पहलगाममध्ये २६ मायभगिनींचे कुंकू पुसणाऱ्या दहशतवाद्यांचा खात्मा करून सैन्याने बदला घेतला. पाकिस्तानचे भारतातील 'स्लीपर्स सेल' उद्ध्वस्त करून दहशतवादाचे समूळ उच्चाटन करणे गरजेचे आहे. भारतीय सैन्य सर्व प्रकारच्या परिस्थितीशी सामना करण्यास सक्षम आहे. 'ऑपरेशन सिंदूर'ने ते दाखवून दिले. भारतीय सेनेच्या शौर्याला शिवसेनेचा सलाम!

## एअर स्ट्राईक ही दिशाभूल

■ **मुंबई :** पाकिस्तान आधीच बरबाद झालेला देश आहे, त्याला काय अजून बरबाद करणार? असा सवाल करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केंद्र सरकारच्या एअर स्ट्राईक धोरणावर टीका केली आहे. त्यांनी स्पष्टपणे म्हटलं आहे की दहशतवादी हल्ल्यांचं उत्तर युद्ध नसून थेट हल्लेखोरांवर कारवाई असावी.



राज ठाकरे यांनी पत्रकारांशी बोलताना सरकारवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ज्यांनी हल्ला केला ते अतिरेकी अजून सापडलेले नाहीत. मग एअर स्ट्राईक करून सामान्य जनतेला वेगळ्या विषयाकडे वळवणं, ही योग्य पद्धत नाही. त्यांनी सरकारकडून होत असलेल्या कारवायांवर संशय व्यक्त करत म्हटलं की, ह्युद्धाच्या आणि राष्ट्रवादाच्या नावाखाली लोकांच्या भावना भडकवण्याचा हा प्रयत्न आहे.

## पहलगाम हल्ल्याचा बदला

■ **नागपूर :** पहलगाम येथे निष्पाप भारतीयांवर झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याचा प्रतिशोध घेण्यासाठी भारतीय सशस्त्र दलांनी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकव्याप्त काश्मीरमधील नऊ दहशतवादी तळांवर अचूक क्षेपणास्त्र हल्ले करून मोठी कारवाई केली. या धाडसी पावलाचे काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी स्वागत करत भारतीय सैन्याच्या धैर्याला सलाम केला आहे.



वडेट्टीवार म्हणाले, पहलगाममधील हल्ल्यात अनेक निष्पापांनी आपले प्राण गमावले. अशा भ्याड कृत्यांना भारतीय सैन्याने दिलेले हे प्रत्युत्तर केवळ योग्यच नाही, तर धाडसीही आहे. ऑपरेशन सिंदूरमधून सैन्याने दहशतवाद्यांना चोख उत्तर देत देशवासीयांना सुरक्षिततेचा विश्वास दिला आहे.

पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधून सातत्याने भारतावर होणाऱ्या दहशतवादी कारवायांविरोधात भारताने नेहमीच कठोर भूमिका घेतली असून, ही कारवाई त्याच धोरणाचा एक भाग आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. भारताविरुद्ध कोणताही दहशतवाद सहन केला जाणार नाही, हाच आजच्या कारवाईचा स्पष्ट संदेश आहे, असेही वडेट्टीवार म्हणाले.

## ना भुलेंगे, ना भूलने देंगे!

■ **मुंबई :** पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा भारतीय सुरक्षा दलानी पुरेपूर बदला घेतला. भारतीय सुरक्षा दलांचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. एक सामान्य भारतीय नागरिक म्हणून दहशतवादाला चोख प्रत्युत्तर देण्याच्या संदर्भात मोदी सरकारच्या प्रत्येक कृतीच्या पाठीशी आम्ही ठाम उभे आहोत. जगातील महत्वाच्या देशांशी संवाद साधून आणि भारताची न्याय्य बाजू पटवून देत, अत्यंत विचारपूर्वक हा निर्णय घेण्यात आला. भारताचे सामर्थ्य आणि निर्धार जगाला दाखवून देणारा निर्णय घेतल्याबद्दल पंतप्रधान मोदी यांचे अभिनंदन!



## सैनिकांच्या समर्थनात एकजूट

■ **मुंबई :** शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांनी देखील एका पोस्टच्या माध्यमातून हा देश एकजूट असल्याचे म्हटले आहे. ते म्हणाले की, 'आपल्या सशस्त्र दलांनी पुन्हा एकदा आपल्या राष्ट्राचे रक्षण करण्यासाठी अढळ दृढनिश्चय दाखवला आहे. पीओकेमधील दहशतवादी पायाभूत सुविधांवर केलेले हवाई हल्ले हे दहशतवाद संपवण्याच्या भारताच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहेत. आम्ही आमच्या सैनिकांच्या आणि त्यांच्या मोहिमेच्या समर्थनात एकजूट आहोत.



## फक्त पंजा उगारला आहे

■ **मुंबई :** भारतीय लष्कराने पाकिस्तानच्या दहशतवादी तळांवर हल्ला केला, आता तरी पाक शिकवण घेईल, अशी आशा आहे. ही फक्त पहिली कारवाई आहे, वाघाने फक्त पंजा उगारला आहे, अजून जबडा उघडायचा बाकी आहे, पण आम्हाला समाधान मिळाले आहे, भारतीय म्हणून हीच भावना वाटते, असे राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले.



**: लोक सेवार्थ :**

## विक्रोळीच्या गणेशोत्सव मंडळाची अशीही जनसेवा



**लोकजागर**

आपल्या महाराष्ट्रात विशेषतः मुंबईत गणेसोत्सव मंडळांची फार मोठी आणि जुनी परंपरा आहे. अर्थात मुंबईतील याच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या वतीने जितक्या जल्लोषात गणेशोत्सव साजरे केले जातात तितकेच या मंडळांना सामाजिक भान देखील असते आणि त्यातूनच अनेक गणेशोत्सव मंडळ जमलेल्या वर्गणीतून आपले उत्तरदायित्व म्हणून सामाजिक कार्यासाठी वर्गणीचा निधी वापरतात.

विक्रोलीचे हरयाली व्हिलेज हे गणेशोत्सव मंडळ देखील मागील काही वषार्पासून सामाजिक भान जपत गरिबासाठी मदत करत आहे. विक्रोळीच्या हरियाली व्हिलेज सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने आपली वेगळी ओळख जपत जनसेवेचे कार्य अविरतपणे चालविले असून हे मंडळ आठ निराधार नागरिकांचा आधारवड बनले आहे.

हरियाली व्हिलेज सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने २००८ पासून विक्रोळीतील निराधार नागरिकांना जीवनावश्यक वस्तू देण्याचा उपक्रम अखंडितपणे राबवला आहे. या मंडळाने ८ निराधार व्यक्तींचे पालकत्व स्वीकारले आहे. प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेला मंडळाकडून निराधारांना जीवनावश्यक वस्तू थेट घरपोच दिल्या जात आहेत.

याआधी तब्बल १० निराधारांना मंडळाकडून दरमहा रेशन पुरवले जात होते. त्यापैकी २ निराधारांचा मृत्यू झाल्याने मंडळ सध्या ८ निराधारांचा आधारवड बनले आहे.

या निराधारांना पाच किलो गहू, दहा किलो तांदूळ, साबण, तेल अशा दैनंदिन अत्यावश्यक वस्तू देण्यात येत असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष संदेश दिघे यांनी दिली. हे मंडळ दरवर्षी आठ फुटाची गणेश मूर्ती आणते. मूर्ती सहज उचलून व्यवस्थित विसर्जन करता यावे, हा त्यामागील उद्देश आहे. मंडळाची मूर्ती शाडू मातीची असून त्याचे पेटंट घेण्यात आले आहे. त्याचप्रमाणे 'हरियालीचा राजा' म्हणूनही नोंदणी करण्यात आली आहे.

मराठी माणसांची एकजूट कायम टिकावी यासाठी माजी मुख्यमंत्री आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एकत्र यावे, असा संदेश देणारा देखावा मंडळाने मागील वर्षी साकारला होता. विक्रोळीप्रमाणे राज्यात अनेक समस्या सोडवण्यासाठी सर्वांनी एकत्र आले पाहिजे, असाही संदेश देखाव्यातून देण्यात आला आहे.

हरियाली व्हिलेज सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ १९६३ साली स्थापन झाले. तेव्हापासून मंडळामार्फत आजतागायत गणेशोत्सव आणि सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. यापूर्वी स्त्रीभ्रूण हत्या, स्त्री अत्याचार अशा विषयांना देखाव्यांमधून समाजापुढे आणले होते.एकूणच, हरियाली व्हिलेज गणेशोत्सव मंडळाचे हे सामाजिक कार्य कौतुकास्पद आहेच आणि त्याच वेळी इतर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना प्रेरणादाई असेच आहे.

■ ■ ■

## भरारी कल्पनेची



कल्पना सरोज यांच्या कल्पनातीत भरारीची कहाणी यशस्वी व्यक्तीची कहाणी सर्वांनाच आकर्षित करते. यशोगाथा वाचून लोक यशाचा मूलमंत्र जाणून घेतात. या प्रेरणादायी कहाण्या वाचून अनेकांमध्ये सकारात्मक परिवर्तन होत आहे, काहीतरी करण्याची जिद्द निर्माण होत आहे.

अशीच एक प्रेरणादायी कहाणी आहे कल्पना सरोज यांची. ही कहाणी कित्येकांसाठी प्रेरणादायी ठरली आहे, बोधकथा ठरली आहे. कल्पना सरोज या भारतातल्या सर्वात यशस्वी महिला उद्यमींपैकी एक आहे. त्यांची कहाणी वेगळी आहे, छाप पाडणारी आहे, शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या एका गावातल्या महिलेची आहे. या कथेत अनेक चढउतार आहे, संघर्ष आहे, नैराश्य आहे, निरागसता आहे, अपयश दडलेले आहे मात्र या अपयशातच भलेमोठे यश दडलेले आहे.

शेणाच्या गोवऱ्या विक्रीपासून ते थेट कोट्यवधींचा व्यवसाय करणाऱ्या या यशस्वी महिला उद्यमीचा प्रवास थक्क करणारा आहे. एक गरीब महिला ज्यांच्याकडे मुंबईमध्ये राहायला घर देखील नव्हते, त्यांनी बांधकाम व्यवसायात यशाची शिखरे पादाक्रांत करत यशस्वी व्यावसायिक म्हणून नाव कमावले. एका दलित कुटुंबात जन्म झालेल्या सरोज यांच्या घरात कोणताही व्यावसायिक वारसा नसताना प्रसिद्ध उद्योगपती रामजी हंसराज कमानी यांच्या बुडीत खात्यात गेलेल्या कोट्यवधीच्या कंपनीला पुन्हा उभारी देत त्याच्या मालकीण झाल्या.

कल्पना सरोज यांनी आपल्या जीवनात जातीवाद, गरीबी, बाल-विवाह, सासरच्या लोकांकडून छळ, अपमान, निंदा, तिरस्कार, धमक्या, अपघात या साऱ्याचा अनुभव घेतला आहे. असह्य अशा परिस्थितीसमोर हात टेकत त्यांनी एकदा आत्महत्या देखील करायचा प्रयत्न केला, मात्र त्यातून त्या बचावल्या. प्रतिकूल परिस्थितीत मेहनत, इमानदारी, साहसी वृत्तीने मार्गक्रमण करत उतुंग उंची गाठणाऱ्या कल्पना यांची कहाणी सर्वसामान्याना विचार करण्यास भाग पाडते.

■ ■ ■

**शब्दार्थ**

**JEE**

JEE शब्दाचा अर्थ होतो संयुक्त प्रवेश परीक्षा. JOINT ENTRANCE EXAMINATION. NEET परीक्षा ही वैद्याकीय अभ्यासक्रमसाठी असते तशीच JEE परीक्षा अभियांत्रिकी पदवीसाठी असते. जी परीक्षा IIT JEE होती तीच JEE ॲडव्हान्स टेस्ट. JEE ही प्रवेश परीक्षा अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम साठी असते, इंजिनिरिंग कॉलेजला प्रवेश घेण्यासाठी JEE परीक्षा देणं अनिवार्य असते. या परीक्षेत मिळालेल्या श्रेणीनुसार भारतातील अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यार्थ्यांना प्रवेश मिळतो.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com